रायगड, नवी मुंबई
# रामप्रहर
◆ वर्ष १७ ◆ अंक ३५
www.ramprahar.com
बुधवार, २१ ऑगस्ट २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## भाजप नेते धैर्यशील पाटील यांना राज्यसभेची उमेदवारी



**मुंबई :** भारतीय जनता पक्षाकडून राज्यसभेच्या उमेदवारांची यादी जाहीर करण्यात आली आहे. भाजपने महाराष्ट्रातून दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष व पेणचे माजी आमदार धैर्यशील पाटील यांना राज्यसभेची उमेदवारी जाहीर केली आहे. पाटील यांनी मागील वर्षी शेकापतून भाजपमध्ये प्रवेश केला होता. भाजपने राज्यसभेसाठी नऊ उमेदवारांची यादी जाहीर केली आहे. यात आसामधून मिशनरंजन दास, रामेश्वर तेली, बिहारमधून मनन कुमार मिश्र, हरियाणामधून किरण चौधरी, मध्य प्रदेशमधून जॉर्ज कुरियन, महाराष्ट्रातून धैर्यशील पाटील, ओडिसा येथून ममता मेहंता, राजस्थानमधून सरदार रवनीत सिंह बिट्टू, त्रिपुरा येथून राजीब भट्टाचार्जी यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. राज्यसभेच्या १२ रिक्त जागांसाठी ३ सप्टेंबर रोजी निवडणूक व त्याच दिवशी मतमोजणी होणार आहे.


### अंतरंग

पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करा -डॉ. बास्टेवाड/२

काशिद समुद्रकिनारी पर्यटकांचे वाचवले प्राण/५

पुण्याच्या माऊलीने मांडव्यात जिंकली आव्हानाची कुस्ती/८


### दोन चिमुकल्या मुलींवरील अत्याचाराचा निषेध

# बदलापूरमध्ये नागरिकांचा ‘रेल रोको’

## नराधमाला फाशी देण्याची मागणी | सरकारकडून आंदोलनाची गंभीर दखल

**बदलापूर : प्रतिनिधी**

बदलापूरमध्ये दोन चिमुकल्या मुलींवर शाळेत झालेल्या अत्याचाराच्या निषेधार्थ पालक व नागरिकांनी मंगळवारी (दि. २०) येथील रेल्वेस्थानकात आंदोलन केले. आंदोलकांकडून आरोपीला फाशीची शिक्षा देण्याची मागणी करण्यात आली. दरम्यान, राज्य सरकारने या घटनेची गंभीर दखल घेत विविध घोषणा, कारवाया आणि उपाययोजना जाहीर केल्या तसेच मंत्री गिरीश महाजन यांना आंदोलकांसोबत चर्चेस पाठविले. त्याचप्रमाणे नंतर शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांनीही जाऊन संवाद साधला. दरम्यान, आंदोलक पांगल्यानंतर रात्री लोकलसेवा पूर्ववत करण्यात आली.



बदलापूर पूर्वेतील आदर्श या नामांकित शैक्षणिक संस्थेच्या शाळेतील छोट्या शिशु वर्गात शिकणाऱ्या तीन वर्षांच्या दोन मुलींवर अत्याचार झाला आहे. एका मुलीने तिच्या पाल्यांना शाळेतील साफसफाई करणाऱ्या दादा नावाने परिचीत असलेल्या एका व्यक्तीने आपल्या गुप्तांगाला हात लावल्याची माहिती दिली. त्यानंतर पालकांनी त्या मुलीच्या वर्गातील दुसऱ्या मुलीच्या पालकांना याबाबत कळवले. त्यांना संशय आल्याने त्यांनी आपल्या मुलीला बदलापूरमधील एका रुग्णालयात तपासणीसाठी नेले. या तपासणीनंतर रुग्णालयाने त्यांना अत्याचार झाल्याबाबत दुजोरा दिला. या प्रकरणी आरोपी अक्षय शिंदे (वय २४) याला पोलिसांनी अटक केली आहे.

अगदी अजाणत्या वयातच दोन चिमुकल्यांना सोसाव्या लागलेल्या या वेदनांमुळे बदलापुरातील प्रत्येकजण हळहळला आणि चिमुरड्यांना न्याय मिळवून देण्यासाठी रस्त्यावर उतरला. बदलापूरकरांनी चिमुकल्यांवर अत्याचार करणाऱ्या क्रूर नराधमाला फासावर लटकवा असा एकच सूर लावून धरला. शाळेबाहेर नागरिकांनी आंदोलन केलेच, पण बदलापूरकरांनी रेल रोकोही केला. बदलापूर स्टेशनच्या ट्रॅकवर उतरून नागरिकांनी आपला रोष व्यक्त केला. राज्य सरकारकडून मंत्री गिरीश महाजन यांनी आंदोलकांशी चर्चा केली आणि आरोपीला कठोर शिक्षा देण्यासाठी जे काही करावे लागेल ते करू, असे स्पष्ट केले.

बदलापूरमधील शाळेत मुलींवर झालेल्या अत्याचाराची मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी गंभीर दखल घेत आरोपीला कडक शासन करण्यात येईल यासाठी जलदगती न्यायालयात तातडीने खटला चालविण्याचे निर्देश दिले आहेत. या घटनेसंदर्भात मुख्यमंत्र्यांनी तातडीने शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांच्याशी चर्चा केली आणि अशा घटना होऊ नयेत म्हणून कायमस्वरूपी ठोस उपाय योजण्यास सांगितले. **(पान २ वर..)**

### खटला फास्ट ट्रॅक कोर्टात चालवला जाणार

बदलापूरमध्ये दोन लहान मुलींवर शाळेत झालेल्या अत्याचाराची गंभीर दखल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घेतली असून अशा घटना घडल्यास प्रसंगी संस्थाचालकांवरदेखील कारवाई करण्यात येईल, असा इशारा दिला आहे. आरोपीला कडक शासन करण्यासाठी जलदगती न्यायालयात तातडीने खटला चालविण्याचे निर्देशही त्यांनी दिले. या संदर्भात मुख्यमंत्र्यांनी पोलीस आयुक्तांशीदेखील चर्चा केली.

### चौकशीसाठी एसआयटी गठीत; तीन पोलिसांचे तत्काळ निलंबन

बदलापूरच्या शाळेतील दोन मुलींवरील घटनेच्या सखोल चौकशीसाठी सरकारने विशेष तपास पथकाची (एसआयटी) स्थापना केली आहे. त्याचप्रमाणे या घटनेत गुन्हा नोंदवण्यास विलंब करणारे बदलापूर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक, सहाय्यक उपनिरीक्षक आणि हेडकॉन्स्टेबल यांना तत्काळ प्रभावाने निलंबित करण्याचे आदेश उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत.

## उद्धव ठाकरे यांच्या गळ्यात काँग्रेसचे उपरणे

### सद्भावना दिन कार्यक्रमात अनोखे चित्र



**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबई काँग्रेसच्या वतीने मंगळवारी (दि. २०) आयोजित राजीव गांधी सद्भावना दिन कार्यक्रमात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे अध्यक्ष उद्धव ठाकरे यांच्या गळ्यात काँग्रेसचे उपरणे दिसून आले.

काँग्रेसच्या सद्भावना दिवस कार्यक्रमात माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आणि खासदार संजय राऊत यांनी उपस्थिती लावली. त्या वेळी काँग्रेस नेत्यांनी उद्धव ठाकरेंच्या गळ्यात आपल्या पक्षाचे उपरणे घातले. या वेळी हसत हसत त्यांनी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले आणि राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगेंशी गप्पाही मारल्या. नंतर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवारही या कार्यक्रमात आले. सुरुवातीला पवारांनी काँग्रेसचे उपरणे घालण्यास नकार दिला. त्यानंतर उद्धव ठाकरे यांनीही त्यांच्या गळ्यातील उपरणे काढले आणि बाजूला ठेवले.

या वेळी काँग्रेसचे आमदार भाई जगताप यांनी ते उपरणे गळ्यातच ठेवावे असा आग्रह उद्धव ठाकरेंना केला, मात्र उद्धव ठाकरे यांनी हसत हसत त्याला नकार दिला. दुसरीकडे संजय राऊतांनी त्यांच्या गळ्यातील उपरणे कायम ठेवले. काही वेळाने शरद पवारांनीही काँग्रेसचे उपरणे गळ्यात घातले. ही सगळी दृश्ये कॅमेऱ्यात कैद झाली आहेत. याबद्दल ठाकरेंनी भाषणात स्पष्टीकरण दिले असले तरीही त्यांच्या गळ्यात काही वेळ का होईना काँग्रेसचा गमछा होता, हे सर्वांना दिसून आले. त्यामुळे चर्चांना उधाण आले आहे.

### यूपीएससीकडून वरिष्ठ अधिकाऱ्यांची थेट भरती रद्द

**नवी दिल्ली :** केंद्र सरकारमध्ये सहसचिव, संचालक आणि उपसचिव या पदांवर लवकरच परीक्षा न घेता विविध क्षेत्रातील तज्ज्ञांची भरती करण्यासाठी केंद्रीय लोकसेवा आयोगाने (यूपीएससी) जाहिरात काढली होती. ४५ जागांसाठी ही भरती होणार होती, पण याबाबत केंद्रीय मंत्री जितेंद्र सिंह यांनी यूपीएससीच्या अध्यक्ष प्रिती सुदान यांना पत्र लिहिले. केंद्र सरकारच्या आदेशानंतर यूपीएससीने ही जाहिरात रद्द करत असल्याचे सांगितले आहे.

## निवडक

### कोलकाता बलात्कार, हत्येवरून कोर्टाने प. बंगाल सरकारला झापले

**नवी दिल्ली :** कोलकात्यामधील प्रशिक्षणार्थी डॉक्टर तरुणीवर बलात्कार व हत्येच्या घटनेवर सर्वोच्च न्यायालयाने चिंता व्यक्त करीत पश्चिम बंगाल सरकारवर ताशेरे ओढले आहेत. या प्रकरणी गुन्हा नोंद व्हायला तीन तास उशीर झाला, यावरूनही सरन्यायाधीश चंद्रचूड यांनी ममता सरकारला फटकारले तसेच डॉक्टरांना कामाच्या ठिकाणी सुरक्षिततेसाठी कार्यपद्धती तयार करण्यास नऊ सदस्यीय राष्ट्रीय टास्क फोर्सची स्थापना करण्याचे आदेश दिले आहेत.

### मंकीपॉक्सचा वेगाने प्रसार; विमानतळे, बंदरांवर तपासणी

**मुंबई :** जगभरात मंकीपॉक्स हा आजार वेगाने पसरत आहे. त्यामुळे भारतातही अलर्ट जारी करण्यात आहे. या संबंधी राज्याच्या आरोग्यसेवा संचलनालयाने मार्गदर्शक सूचना जाहीर केल्या आहेत. त्यानुसार राज्यातील सर्व आंतरराष्ट्रीय विमानतळ, बंदरांवर मंकीपॉक्सची तपासणी केली जाणार आहे. संशयित रुग्ण आढळल्यास त्याच्या विलगीकरणासाठी यंत्रणा उभारण्याच्या सूचना करण्यात आल्या आहेत.

## अलिबागच्या कुरूळमध्ये लाचखोर ग्रामसेवकासह लिपिकाला अटक

**अलिबाग : प्रतिनिधी**

घराला घरपट्टी आकारून असेसमेंट उतारा देण्यासाठी ५० हजार रुपयांची लाच घेताना अलिबाग तालुक्यातील कुरूळ ग्रामपंचायतीचे ग्रामसेवक श्रीहरी अर्जुनराव खरात (वय ३६) व लिपिक सुजित श्याम पाटील उर्फ पिंट्या (वय ३९) यांना रायगड लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) मंगळवारी (दि २०) अटक केली.





तक्रारदार यांनी कुरूळ येथे भूमापन क्रमांक व उपविभाग ३४/४ येथे स्वतंत्र घर बांधलेले आहे. या घरास घरपट्टी आकारून असेसमेंट उतारा मिळण्याकरिता ग्रामसेवकांना विनंती केली होती. घरपट्टी आकारणे व असेसमेंट उतारा मिळण्यासाठी ग्रामसेवक श्रीहरी खरात यांनी तक्रारदार यांच्याकडे ५० हजार रुपये लाच मागितली. दरम्यान, तक्रारदार यांनी याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभागाला कळविले होते. त्यानुसार सापळा रचण्यात आला.

ग्रामसेवक श्रीहरी खरात यांनी लाचेची रक्कम ५० हजार रुपये ही लिपिक सुजित पाटील यांस घेण्यास सांगितली. सुजित पाटील यांनी ही रक्कम कुरूळ ग्रामपंचायत आवारात तक्रारदार यांच्याकडून स्वीकारताना लाचलुचपत विभागाने रंगेहात पकडले. ग्रामसेवकाच्या सांगण्यावरून पैसे घेतल्याचे लिपिकाने सांगितले. त्यानंतर ग्रामसेवक खरात यांनाही ताब्यात घेण्यात आले. दोन्ही आरोपींविरोधात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया उशिरापर्यंत सुरू होती.

पोलीस उपअधीक्षक शशिकांत पाडावे, सहाय्यक फौजदार विनोद जाधव, सहाय्यक फौजदार अरुण करकरे, हवालदार महेश पाटील, हवालदार सागर पाटील यांनी ही कारवाई केली.

दरम्यान, शासकीय काम करून देण्यासाठी कायदेशीर फीव्यतिरिक्त अन्य कुणी लाचेची मागणी करीत असल्यास तत्काळ संपर्क साधावा, असे आवाहन लाचलुचपत प्रतिबंधक विभगाने केली आहे.

## पनवेलमधील पहिल्यावहिल्या पूर्ण मॅरेथॉनची तारीख जाहीर

### आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते लोगोचे अनावरण

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्ह्यात प्रथमच पूर्ण मॅरेथॉनचे आयोजन करण्यात आले आहे. पनवेल शहरात येत्या १ डिसेंबर रोजी ही पूर्ण मॅरेथॉन म्हणजेच ४२ किलोमीटरची स्पर्धा पार पडणार आहे. या पार्श्वभूमीवर मंगळवारी (दि. २०) मॅरेथॉनच्या लोगोचे अनावरण आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते नवीन पनवेलच्या स्पाईस वाडीत डिजिटल पद्धतीने करण्यात आले. याचबरोबर या स्पर्धेशी संबंधित वेबसाईट पेजचे प्रकाशन होऊन रजिस्ट्रेशनसाठी नोंदणीही सुरू झाली.





या वेळी आपल्या छोटेखानी भाषणात पनवेल शहराचे महत्त्व आमदार प्रशांत ठाकूर यांनी पटवून देऊन या मॅरेथॉनसाठी सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. यासोबतच खेळाडू तयार होण्यासाठी अशा स्पर्धा आयोजित करणे गरजेचे असल्याचे म्हटले, तर डॉ. कल्याण पाटील यांनी आरोग्याच्या दृष्टीने धावण्याचे महत्त्व अधोरेखित केले.

या कार्यक्रमास रनर अजित कंबोज, स्पर्धेचे आयोजक सुरेश रिसबूड, प्रफुल वाझे उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कुमार ठाकूर यांनी केले.

आगामी काळात या स्पर्धेच्या अनुषंगाने विविध कार्यक्रमदेखील राबविण्यात येणार आहेत. याची माहिती वेळोवेळी देण्यात येईल, असे आयोजकांकडून सांगण्यात आले.

दरम्यान, या मॅरेथॉनसाठी नोंदणी करायची असल्यास indiarunning आणि Townscriptवर ऑनलाईन पद्धतीने करता येईल.

## कोळीवाडा ही पनवेलची शान -परेश ठाकूर





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कोळी बांधवांनी आपली संस्कृती अजूनही जपून ठेवली असून पनवेल कोळीवाडा ही येथील शान आहे, असे गौरवोद्गार पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी सोमवारी (दि. १९) नारळी पौर्णिमेच्या कार्यक्रमावेळी काढले.

कोळी समाजात नारळी पौर्णिमेला अनन्यसाधारण महत्त्व आहे. हा सण पनवेलमध्ये मोठ्या जल्लोषात साजरा झाला. यानिमित्ताने पनवेल कोळीवाड्याच्या वतीने विविध कार्यक्रमांचे आयोजन केले गेले होते. प्रारंभी कोळीवाडा, उरण नाका परिसरात वाजतगाजत पालखी मिरवणूक काढण्यात आली. यामध्ये कोळी समाजातील मुला-मुलींनी पारंपरिक वेशभूषेसह सहभागी होत नृत्य करून मने जिंकली.

कोळी लोक सागराला नारळ अर्पण करून मासेमारीच्या नव्या हंगामाला सुरुवात करतात. त्यानुसार सोन्याचा मुलामा दिलेला नारळ माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते नदीत अर्पण करण्यात आला. या कार्यक्रमाचे औचित्य साधून गुणवंत विद्यार्थ्यांना परेश ठाकूर व इतर मान्यवरांच्या हस्ते भेटवस्तू देऊन गौरविण्यात आले.

या कार्यक्रमास सामाजिक कार्यकर्ते राकेश पोटे, दत्ता पाटील, हारु भगत, गणेश भगत, आदेश ठाकूर यांच्यासह पंच कमिटीचे सदस्य आणि कोळी बांधव, भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पुणे हिट अॅण्ड रनप्रकरणी आणखी एक जणाला अटक

**पुणे : प्रतिनिधी**

पुणे कल्याणी नगर अपघात प्रकरणात मोठी घडामोड समोर आली आहे. या प्रकरणात आणखी एक अटक करण्यात आली आहे. अल्पवयीन मुलांचे रक्त नमुने बदलण्याच्या गुन्ह्यात ही अटक झाली आहे.

पुण्याच्या कल्याणी नगर येथे एका अल्पवयीन मुलाने मद्यधुंद अवस्थेत सुस्साट कार चालवत दोन जणांना धडक दिली होती. यात दोघांचाही मृत्यू झाला. या घटनेने सर्वत्र संतापाचे वातावरण पसरले होते. या प्रकरणी अल्पवयीन मुलाच्या आई, वडील व आजोबांना अटक करण्यात आली, तर मुलाला बालसुधारगृहात पाठवण्यात आले होते. दरम्यान, पुणे पोलिसांनी सोमवारी रात्री आणखी एका नातेवाईकाला अटक केली आहे.

## अलिबागेत दहीहंडी सराव शिबिर उत्साहात

**अलिबाग : प्रतिनिधी**

भाजपचे दक्षिण जिल्हा उपाध्यक्ष दिलीप भोईर उर्फ छोटमशेठ यांनी पुरस्कृत केलेले आणि अलिबाग कोळीवाडा गोविंदा पथक व भाजपने आयोजित केलेले दहीहंडी सराव शिबिर मंगळवारी (दि. २०) उत्साहात झाले. अलिबागेतील जेएसएम कॉलेजच्या प्रांगणात रंगलेल्या दहीहंडी पथक सराव शिबिरात मेटपाडा गोविंदा पथकाने ५१ हजारांची हंडी जिंकली, तर महिलांच्या श्रेणीत मी अलिबागकर हे पथक विजयी ठरले.

अलिबाग तालुक्यापुरत्या मर्यादित असलेल्या या सराव शिबिरात एकूण ३६ गोविंदा पथके सहभागी झाली होती. अलिबागमधील या पथकांसोबत माझगाव दक्षिण विभाग सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ गोविंदा पथक ताडवाडी आणि जोगेश्वरी माता महिला सर्वजनिक पथक या मुंबईतील पथकांची चित्तथरारक प्रत्यक्षिके ग्रामीण गोविंदांना मार्गदर्शक ठरली.

ग्रामीण भागातील तरुणवर्गाला गोविंदा या सांस्कृतिक व साहसी खेळाचे दहीहंडी सराव शिबिराच्या माध्यमातून प्रशिक्षण मिळावे या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या शिबिराला मिळालेल्या उत्स्फूर्त प्रतिसादाबद्दल मी सर्वांचा आभारी आहे. पुढील वर्षी याहून भव्य प्रकारे या सराव शिबिराचे आयोजन करण्यात येईल. आतापासूनच गोविंदा पथकांनी त्या तयारीला लागावे, असे आवाहन या वेळी भाजप नेते दिलीप भोईर यांनी केले. **(पान २ वर..)**



# शासकीय तंत्रनिकेतनचे इमारत बांधकाम तत्परतेने करावे

## ◆ सार्वजनिक बांधकाममंत्री रवींद्र चव्हाण यांचे निर्देश



**मुंबई : प्रतिनिधी**

शासकीय तंत्रनिकेतनच्या इमारत बांधकामांच्या निविदा प्रक्रिया येत्या महिनाअखेर पूर्ण कराव्यात तसेच विहित कालमर्यादेत या सर्व इमारतींचे बांधकाम पूर्णत्वास नेण्याच्या सूचना सार्वजनिक बांधकाम मंत्री (सार्वजनिक उपक्रम वगळून) रवींद्र चव्हाण यांनी दिल्या.

शासकीय तंत्रनिकेतन इमारतींच्या बांधकामासंदर्भात मंत्रालयात आयोजित आढावा बैठकीत मंत्री चव्हाण यांनी संबंधितांना सूचित केले. या वेळी उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अपर मुख्य सचिव मनीषा म्हैसकर पाटणकर, सचिव सदाशिव साळुंखे, सचिव संजय दशपुते यांच्यासह उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

या वेळी अमरावती, नागपूर, नाशिक, पुणे, नांदेड, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, रत्नागिरी, कोकण, ठाणे, विक्रमगड, पेण या ठिकाणच्या मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अंतर्गत असलेल्या शासकीय तंत्रनिकेतन इमारतींच्या बांधकाम प्रस्तावांच्या संदर्भात सद्यस्थितीचा आढावा घेऊन मंत्री चव्हाण यांनी या महिनाखेर सर्व निविदा प्रक्रिया पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या. तसेच याबाबत पुढील कार्यवाही तत्परतेने करून शासकीय तंत्रनिकेतनच्या इमारतीचे बांधकाम विहित कालमर्यादेत पूर्ण करण्याबाबत संबंधितांना सूचित केले.

मंत्री पाटील म्हणाले की, शासकीय तंत्रनिकेतन मधील पदविकाधारक विद्यार्थ्यांना देशांतर्गत तसेच बाहेरही मागणी वाढत असून रोजगाराच्या संधी या विद्यार्थ्यांना उपलब्ध होत आहेत. शासकीय तंत्रनिकेतनमधून प्राप्त होणाऱ्या कौशल्याची उपयुक्तता आणि महत्त्व विशेष उपक्रमाद्वारे उच्च शिक्षण विभागाने पालक आणि विद्यार्थी यांच्यापर्यंत पोहचवले आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांची प्रवेश संख्या वाढत असून या पार्श्वभूमीवर तंत्रनिकेतन इमारतीचे बांधकाम हे दर्जेदार करण्याची खबरदारी सर्व संबंधितांनी घ्यावी, सुविधायुक्त तंत्रनिकेतन विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देण्याच्या व्यापक उद्देशाने सर्वांनी कार्यवाही करावी, असे मंत्री पाटील यांनी सांगितले.

# भाविकांनी पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करावा

## रायगडचे सीईओ डॉ. भरत बास्टेवाड यांचे आवाहन

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यात गणेशभक्तांनी गणेशोत्सव साजरा करताना प्रदूषण नियंत्रण मंडळाने यापूर्वी दिलेल्या सूचनांचे पालन करून, पर्यावरणपूरक उत्सव साजरा करावा, असे आवाहन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बास्टेवाड व पाणी व स्वच्छता विभाग उपमुख्य कार्यकारी अधिकारी शुभांगी नाखले यांनी केले आहे.

याबाबत ग्रामपंचायत स्तरावर करावयाच्या उपाययोजनांची माहिती तालुकास्तरावर पंचायत समिती गटविकास अधिकारी, तसेच गावस्तरावर ग्रामसेवक, सरपंच यांना देण्यात आली आहे.

जिल्ह्यात गणेशोत्सव मोठ्या उत्साहात घराघरात साजरा करण्यात येतो. पर्यावरणपूरक सण साजरे करण्याच्या दृष्टीने केंद्रीय प्रदूषण मंडळाने १२ मे २०२० रोजी मार्गदर्शक सूचना दिल्या आहेत. या मार्गदर्शक सूचनांची जिल्ह्यात अंमलबजावणी करण्यासाठी जिल्हा परिषद प्रशासनाने प्रयत्न सुरू केले आहेत. पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

### पर्यावरणपूरक गणेशोत्सवासाठी उपाययोजना

- **शाडूच्या मातीच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठापना करावी.**
- **सजावट करताना प्लास्टिक, थर्माकोलचा वापर न करता पाने, फुले व इतर नैसर्गिक वस्तूंचा वापर करावा.**
- **उत्सवात लाऊडस्पिकरचा आवाज मर्यादित ठेवावा.**
- **निर्माल्य मंगल कलशात टाकून, त्यातून सेंद्रिय खताची निर्मिती करावी.**
- **गणेशोत्सव मंडळांनी पर्यावरण विषयक जनजागृती करावी.**
- **गणपती मूर्तींचे विसर्जन कृत्रिम तलावात करावे.**



**पेण : भाजपचे दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष व माजी आमदार धैर्यशील पाटील यांना राज्यसभेची उमेदवारी जाहीर झाल्यानंतर भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष वैकुंठ पाटील यांनी त्यांचे अभिनंदन केले. या वेळी पेण नगरपालिका परिसरात कार्यकर्त्यांनी जल्लोष केला.**

# कर्जत भाजपकडून रामदास कदमांचा निषेध



**कर्जत : प्रतिनिधी**

भाजप नेते सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण यांच्या विरोधी रामदास कदम यांनी केलेल्या बेताल वक्तव्य केले त्याचा कर्जत तालुका भारतीय जनता पक्षाच्या वतीने जाहीर निषेध करण्यात आआला.

कपालेश्वर मंदिरासमोर लोकमान्य टिळक चौक कर्जत येथे निषेध सभेचे आयोजन करण्यात आले होते. माजी आमदार सुरेश लाड, तालुकाध्यक्ष राजेश भगत, वसंत भोईर, किरण ठाकरे, दीपक बेहेरे, मंगेश म्हसकर, सुनिल गोगटे, तालुका सरचिटणीस संदीप म्हसकर, तालुका सरचिटणीस वसंत महाडिक, शर्वरी कांबळे, आदिसह पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

महायुतीमधील शिवसेनेचे रामदास कदम यांनी सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण यांच्याविषयी बेताल वक्तव्य केले. याचा निषेध म्हणून तालुकाध्यक्ष राजेश भगत यांनी भाजपचे कार्यकर्ते तुम्हाला धडा शिकवतील, असे सांगितले. वसंत भोईर यांनी, आम्ही कोणाच्या वाटेला जात नाही मात्र आमच्या वाटेला गेला तर आम्ही सोडणार नाही. बाळासाहेबांमुळे तुम्ही नेते मंत्री झालात नाही, तर तुम्हाला हॉटेलमध्ये कोणी कपबशी धुवायला ठेवले नसते, अशी टीका केली. किरण ठाकरे यांनी, मुंबई–गोवा रस्त्याचे काम रवींद्र चव्हाण पूर्ण करीत आहेत. त्यामुळे रामदास कदम यांना पोटदुखी झाली आणि त्यामुळेच त्यांनी हे वक्तव्य केले, असे स्पष्ट केले.

माजी आमदार सुरेश लाड यांनी, नारळी पौर्णिमेसारखा चांगला सण असताना रामदास कदम यांनी यांना दुर्बुद्धी झाली आणि त्यांनी महाराष्ट्र शासनातील एक कार्यक्षम असलेले मंत्री रवींद्र चव्हाण यांच्याबाबत बेताल वक्तव्य केले. एका चांगल्या नेतृत्वाचा मंत्राचा अपमान म्हणजे कोकणचा अपमान आहे असे सांगितले. दीपक बेहेरे यांनी सुद्धा रामदास कदम यांचा निषेध केला.

# पुण्यात अल्पवयीन मुलीवर शाळेत अत्याचाराचा प्रयत्न


**पुणे : प्रतिनिधी**

शहरातील भवानी पेठेतील एका शाळेत इयत्ता सातवीमध्ये शिकणाऱ्या मुलीवर १९ वर्षीय तरुणाने गुरुवारी अत्याचार करण्याचा प्रयत्न केल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी आरोपी तरुणाला समर्थ पोलिसांनी अटक केली.




देवराज पदम आग्री (वय १९) असे आरोपी तरुणाचे नाव आहे. पीडित मुलीच्या आईने फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी देवराज पदम आग्री आणि पीडित मुलगी हे दोघेही भवानी पेठेतील एकाच शाळेत शिक्षण घेत आहेत. या दोघांची ओळख असून गुरुवारी शाळेच्या दुसऱ्या मजल्यावर पीडित मुलगी बॅग घेण्यासाठी गेली. त्या वेळी आरोपी मुलगा हा स्वच्छतागृहाजवळ लपून बसला होता. पीडित मुलगी येताच तिचा हात पकडून स्वच्छतागृहामध्ये घेऊन गेला. तिच्या मनाला लज्जा उत्पन्न होईल, असे कृत्य आरोपीने केले. पीडित मुलाने आरोपीला धक्का देऊन तेथून पळ काढला.

या संपूर्ण घटनेची माहिती पीडित मुलीने आईला सांगितली. याप्रकरणी पीडित मुलीने आमच्याकडे फिर्यादी देताच आरोपी देवराज पदम आग्री याच्याविरोधात गुन्हा दाखल करून अटक करण्यात आली आहे.



**खोपोली : अष्टविनायक क्षेत्रापैकी खालापूर तालुक्यातील महड गावातील श्री वरदविनायक मंदिरात श्रावण महिन्यातील तिसऱ्या मंगळवारी फळांची वाडी आणि सुवासिक पुष्पाचन पुजेचे आयोजन करण्यात आले होते. यानिमित्त मंदिराला आकर्षक स्वरूप व वातावरण भक्तिमय झाले होते.**
(छाया : जयवंत माडपे)

पान १ वरुन

## बदलापूरमध्ये नागरिकांचा ‘रेल रोको’

ज्या विद्यार्थी किंवा पालकांना अडचणी येत असतील त्यांच्यासाठी प्रत्येक शाळेत एक तक्रार पेटी लावावी, अशी सूचना त्यांनी केली. याशिवाय शाळेतील ज्या कर्मचाऱ्यांचा विद्यार्थ्यांशी सातत्याने संपर्क असतो त्यावर बारकाईने लक्ष ठेवणे आणि त्याचा ट्रॅक ठेवणे, त्यांची पार्श्वभूमी माहिती करून घेणे गरजेचे आहे. विद्यार्थिनींना थोडा जरा संशय आल्यास त्यांना तातडीने प्राचार्य, मुख्याध्यापक, किंवा शिक्षकांना न घाबरता निदर्शनास आणून देता आले पाहिजे अशी यंत्रणा हवी, असे मुख्यमंत्री म्हणाले.

सर्व शाळांमधील शिक्षक आणि कर्मचारी यांच्याशी संस्थाचालकांनी त्वरित बोलून योग्य ती काळजी घ्यावी. जर संस्थाचालकांची चूक असेल तर प्रसंगी त्यांच्यावरदेखील कारवाई केली जाईल, असे सांगून मुख्यमंत्र्यांनी आंदोलकांना शांततेचे आवाहन केले.

उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही बदलापूर येथील घटना दुर्दैवी असल्याचे सांगत या घटनेची सखोल चौकशी करण्यासाठी पोलीस महानिरीक्षक दर्जाच्या वरिष्ठ आयपीएस अधिकारी आरती सिंग यांच्या अध्यक्षतेखाली विशेष तपास पथक गठीत करण्याचे निर्देश दिले आहेत.

उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, बदलापूरमध्ये शाळेतील चिमुकल्या मुलींवरील अत्याचाराची घटना अतिशय दुर्दैवी आणि अत्यंत संतापजनक आहे. या घटनेत दोषी आढळणाऱ्यांवर कडक कारवाई केली जाईल, कुणालाही पाठीशी घातले जाणार नाही.

बदलापूर येथे शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांनी सांगितले की, झालेली घटना अत्यंत दुर्दैवी घटना असून ही घटना ज्या शाळेत घडली आहे त्या शाळेची, कमिटीची, प्राचार्य यांची चौकशी शिक्षण विभागाचे उपसंचालक व मानवी हक्क आयोगाचे अध्यक्ष करीत असून त्याचा प्राथमिक अहवाल घेण्यात येणार आहे. १३ ऑगस्टच्या आसपास ही घटना घडली असून या घटनेमध्ये जे कोणी दोषी असतील त्यांच्यावर कडक कारवाई करण्यात येईल. उद्या याच ठिकाणी संध्याकाळी ४ वाजता पालकांना भेटायला मी येणार आहे. त्या वेळी पालकांनी आपले जे काही म्हणणे आहे ते मला सांगावे. त्या सर्वांचे म्हणणे ऐकून घेण्यात येणार आहे. त्यानुसार पुढील कार्यवाही करता येईल.

## अलिबागेत दहीहंडी सराव शिबिर उत्साहात

या दहीहंडी सराव शिबिरास भाजप जिल्हा उपाध्यक्ष राजेश मपारा, जयवंत अंबाजी, अलिबाग शहर अध्यक्ष ॲड. अंकित बंगेरा, जिल्हा चिटणीस परशुराम म्हात्रे, सतीश लेले, साळाव ग्रामपंचायतीचे सरपंच वैभव कांबळी, युवा मोर्चा चिटणीस प्रथमेश मांजरेकर, तालुका मंडल अध्यक्ष उदय काठे, महिला मोर्चा अध्यक्ष ॲड. दिपाली भोईर, झिराड ग्रामपंचायतीच्या माजी सरपंच दर्शना भोईर, माजी उपसरपंच महेश माने, जिल्हा कार्यकारिणी सदस्य रवींद्र म्हात्रे, संदेश पालकर, सोशल मीडिया अलिबाग मंडल संयोजक अमित म्हात्रे, वरंडे ग्रामपंचायतीचे माजी सरपंच सुधीर चेरकर यांच्यासह गोविंदाप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मंत्री रामदास आठवलेंकडून दिवंगत व्ही.के. जाधव यांच्या कुटुंबियांचे सांत्वन

**पाली : प्रतिनिधी**

आंबेडकरी बहुजन चळवळीतील धडाडीचे नेतृत्व, कोकण नेते व्हि. के. जाधव हे चळवळीत कायम सक्रिय राहिले. आजन्म निस्वार्थी आणी स्वाभिमानी बाण्याने आपले जीवन समाज, राष्ट्र आणी देशहितासाठी समर्पित केले. त्यांच्या निधनाने आंबेडकरी बहुजन चळवळीची मोठी हानी झाली असल्याचे शोकाकुल उद्गार केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी काढले.

ना. रामदास आठवले यांनी नागोठण्यातील निवासस्थानी दि. व्ही.के. जाधव यांच्या कुटुंबियांची सोमवारी (दि.१९) भेट घेऊन सांत्वन केले. या वेळी ना. आठवले यांनी व्हि. के. जाधव यांच्या पत्नी सुनंदा, आई, सुपुत्र संजय जाधव, सून संध्या जाधव, मुलगी मनीषा रवींद्र मोरे, जावई रवींद्र मोरे, मंगल शिलानंद साळवी, शिलानंद साळवी, संतोष देवराम कांबळे आदी कुटुंबियांची भेट घेतली. या वेळी रोहा तालुक्यात महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकासाठी जागा उपलब्ध करून देण्यासंदर्भातील निवेदन देण्यात आले, तसेच रिलायन्स नागोठणे कंपनीत सुशिक्षित तरुणांना नोकऱ्या देण्यासंदर्भात ना.रामदास आठवले यांनी रिलायन्स व्यवस्थापनाचे अधिकारी यांच्याशी दूरध्वनीवर चर्चा करून जलद कार्यवाही करण्यास सांगितले.

या वेळी रिपाइं रायगड जिल्हाध्यक्ष नरेंद्र गायकवाड, युवक जिल्हाध्यक्ष प्रमोद महाडिक, राहुल डाळिंबकर, पनवेल महानगरपालिका विधानसभा क्षेत्र जिल्हाध्यक्ष प्रभाकर कांबळे, रिपाइं नेते सिद्धार्थ कासारे, रोहा तालुकाध्यक्ष संतोष गायकवाड, सुधागड तालुका अध्यक्ष राहुल सोनावळे, अलिबाग तालुकाध्यक्ष सुनिल सप्रे, शरद पाटील, शिंदे सर रोहा, उद्योजक भगवान बिनेदार, संदीप मोहिते, प्रभाकर ओव्हाळ, दीपक दाभाडे, विलास कांबळे, प्रशिक बिनेदार, सिद्धार्थ गायकवाड, जगदीश वाघमारे, महापरिवर्तनवादी पत्रकार संघांचे राज्य अध्यक्ष धम्मशील सावंत उपस्थित होते.



# ‘जर्मन भाषा शिकण्याची आवड असणाऱ्या शिक्षकांनी नोंदणी करावी’

**रायगड** : जर्मन भाषा शिकण्यासाठी मोठ्या संख्येने शिक्षकांची आवश्यकता असल्याने जिल्ह्यातील शासकीय तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांमधील जर्मन भाषा शिकण्याची आवड असणाऱ्या शिक्षकांनी https://forms.gle/1232ByNwp(MnHmHc7 लिंकवर नावनोंदणी करावी, असे आवाहन प्राचार्य जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था पनवेल डॉ.सुभाष महाजन यांनी केले आहे.

राज्यामध्ये मोठ्या प्रमाणावर उपलब्ध असलेले कुशल मनुष्यबळ आणि अन्य प्रगत युरोपियन देशांमध्ये त्याची असणारी कमतरता या पार्श्वभूमीवर राज्यातील युवकांना युरोपियन देशांमध्ये नोकरी व रोजगाराच्या संधी उपलब्ध आहेत. ही बाब विचारात घेऊन शासनाने जर्मन देशातील बाडेन बुटेनबर्ग या राज्याशी कुशल मनुष्यबळ प्रशिक्षित करुन उपलब्ध करून देण्याबाबत सामंजस्य करार केला आहे.

जर्मन भाषा शिकण्यासाठी जिल्हास्तरावर २५ विद्यार्थ्यांसाठी एक प्रशिक्षण वर्ग याप्रमाणे १०,००० विद्यार्थ्यांसाठी ४०० प्रशिक्षण वर्गाची आवश्यकता आहे. हे प्रशिक्षण वर्ग दोन सत्रात असल्याने (सकाळ व संध्याकाळ) असे २०० प्रशिक्षण वर्ग सुरू करणे प्रस्तावित आहे.

या प्रशिक्षण वर्गासाठी जर्मन भाषेची अर्हता बीए जर्मन, एमए जर्मन ग्योथे इन्स्टिट्यूट यांच्याद्वारे घेण्यात येणारी स्तरनिहाय ए १, ए २, बी १, बी २, सी १, सी २ उत्तीर्ण अशी आहे, मात्र वरील शैक्षणिक अर्हता असणाऱ्या शिक्षकांची संख्या पुरेशा प्रमाणात उपलब्ध नसल्याने शासकीय तसेच स्थानिक स्वराज्य संस्थेच्या शाळांमधील नियमित शिक्षकांसाठी जर्मन भाषेचे प्रशिक्षण वर्ग शासनामार्फत मोफत सुरू करणे प्रस्तावित आहे. यासाठी शिक्षकांनी नांवनोंदणी करण्यासाठी (https://forms.gle/1232ByNwp(MnHmHc7) ही गुगल लिंक तयार करण्यात आली आहे.

# पळस्पेजवळ आठ लाखांचा गुटखा जप्त

## साठा असलेला टेम्पो पनवेल पोलिसांच्या ताब्यात

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल शहर पोलिसांनी जेएनपीटी ते पनवेल महामार्गालगत पळस्पे येथील साईकृपा ढाब्याजवळ मागील चार ते पाच दिवसांपासून बेवारसरित्या उभ्या असलेल्या टेम्पोमधून तब्बल ४.३५ लाख रुपये किंमतीचा गुटखा, पानमसाला आणि सुगंधित तंबाखूचा साठा जप्त केला आहे. पोलिसांनी हा गुटखा टेम्पोसह जप्त करून टेम्पोच्या मुळ मालकाचा शोध सुरू केला आहे.



गेल्या काही दिवसांपासून महाराष्ट्रात विक्री तसेच खाण्यास बंदी असलेल्या गुटख्याची विक्री चोरट्या पद्धतीने होत असल्याने याबाबतच्या अनेक तक्रारी नवी मुंबई पोलीस आयुक्त मिलींद भारंबे यांच्याकडे करण्यात आल्या होत्या. त्यानुसार त्यांच्या आदेशाने प्रत्येक पोलीस ठाण्यांतर्गत अशा प्रकारे विक्री तसेच साठा करणाऱ्या गुटखामाफीयांवर कारवाई करण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार परिमंडळ २चे पोलीस उपायुक्त प्रशांत मोहिते, सहाय्यक आयुक्त अशोक राजपूत यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ निरीक्षक नितीन ठाकरे, निरीक्षक बाळकृष्ण सावंत (गुन्हे), निरीक्षक प्रवीण भगत (प्रशा) यांनी या गुटखा माफियांचा बिमोड करण्यासाठी पथके तयार केली होती.

यानुसार उपनिरीक्षक विनोद लभडे, हवालदार वाघमारे, गंथडे, म्हात्रे, वायकर, खरात, नाईक देशमुख, पारधी, शिपाई दुधे, शिरोळे, कांबळे आदींच्या पथकाला अशा प्रकारचा गुटख्याचा साठा असलेला टेम्पो पनवेल शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीत जेएनपीटी-पनवेल महामार्गालगत सर्व्हीस रोडवर असलेल्या साईकृपा ढाब्याजवळ उभा असल्याची माहिती मिळाली.

यानुसार या पथकाने या ठिकाणी तो टेम्पो ताब्यात घेतला असता त्यात तब्बल ४.३५ लाख रुपये किंमतीचा गुटखा, पानमसाला आणि सुगंधीत तंबाखुचा साठा आढळुन आला. त्यानंतर पोलिसांनी या गुटख्याचा साठा टेम्पोसह असा मिळून आठ लाख ३४ हजार ०२० किंमतीचा ऐवज जप्त करून टेम्पो मालकाविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

# सिडकोच्या अभय योजनेस १५ सप्टेंबरपर्यंत मुदतवाढ

**नवी मुंबई : सिडको वृत्तसेवा**

नवी मुंबईतील सिडकोच्या भूखंडांवर बांधकाम मुदतवाढीकरिता देय असलेल्या अतिरिक्त भाडेपट्टा शुल्क वसुलीबाबत राबविण्यात आलेल्या अभय योजनेस महाराष्ट्र शासनाच्या निर्णयानुसार १५ सप्टेंबर २०२४पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.



नवी मुंबई व परिसरातील सिडकोने भाडेपट्टयाने वितरीत केलेल्या जमिनींच्या विकासनाच्या अनुषंगाने वांधकाम व्यवसायाशी संबंधित अडचणी लक्षात घेता महाराष्ट्र शासनाने १२ जानेवारी २०२४ रोजीच्या आदेशान्वये सिडकोने बांधकाम मुदतवाढीकरिता देय असलेल्या अतिरिक्त भाडेपट्टा शुल्क वसुलीबाबत अभय योजना राबविण्यास तसेच इतर लोकाभिमुख धोरणात्मक निर्णय घेऊन मान्यता दिली होती. सदर अभय योजनेस महाराष्ट्र शासनाने १५ सप्टेंबर २०२४ पर्यंत मुदतवाढ जाहीर केली आहे.

या अभय योजनेस देण्यात आलेल्या मुदतवाढीनुसार, नवी मुंबई क्षेत्र तसेच नवीन शहरे प्रकल्पांतर्गत छत्रपती संभाजीनगर, नाशिक, नांदेड व नागपूर येथील सिडकोच्या प्रकल्पांसाठी अतिरिक्त भाडेपट्टा शुल्क (Additional Lease Premium) तसेच सेवा शुल्क (Service Charge) व विकास शुल्क (Development Charge) मध्ये ५० टक्के सवलत देण्यासंदर्भात राबविण्यात येणाऱ्या अभय योजनेंतर्गत अर्जदारास अर्ज करण्याकरिता १५ सप्टेंबर २०२४पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

अभय योजनेंतर्गत प्राप्त होणाऱ्या अर्ज/निवेदनांवर प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून पुढील १५ दिवसांत नियमोचित तपासणी करून, सिडकोमार्फत संबंधितांना रकमेचा भरणा करणेबाबत कळविण्यात येईल. सिडकोकडून याबाबत कळविण्यात आल्यानंतर पुढील १५ दिवसांच्या आत अर्जदाराने रकमेचा भरणा करणे आवश्यक असणार आहे.

ज्या अर्जांवर भूखंडाचा क्रमांक नमूद केलेला असेल तेच अर्ज परिपूर्ण समजण्यात येतील तसेच १५ सप्टेंबर २०२४ नंतर प्राप्त होणाऱ्या अर्जांचा अभय योजने अंतर्गत विचार केला जाणार नाही, याची कृपया अर्जदारांतर्फे नोंद घेण्यात यावी.

# गव्हाण विद्यालयात शिक्षक पालक आणि माता पालक संघाची स्थापना

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री.छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये शैक्षणिक वर्ष सन २०२४-२५ करिता विविध समित्यांची स्थापना करण्यात आली. शिक्षक पालक संघ, माता पालक संघ व गुरुकुल शिक्षक पालकसंघ आदी संघांची स्थापना करण्यात आली. विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे चेअरमन तथा रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य अरुणशेठ भगत यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सहविचार सभेत शासनाच्या व संस्थेच्या धोरणानुसार विद्यार्थी - शिक्षक व पालक यांच्यात समन्वय ठेवण्यासाठी अशा विविध समित्यांची स्थापना करण्यात आली.

या वेळी स्थानिक शाळा समितीचे सदस्य विश्वनाथ कोळी,ज्येष्ठ नेते जयवंतराव देशमुख, गव्हाण ग्रामपंचायतचे माजी उपसरपंच विजय घरत, शिक्षक पालक संघाचे मावळते उपाध्यक्ष नामदेव ठाकूर, माजी सरपंच जिज्ञासा कोळी, ग्रामपंचायत सदस्या कामिनी कोळी, विद्यालयाचे मुख्याध्यापक गोवर्धन गोडगे, उपमुख्याध्यापक प्रमोद मंडले, 'रयत'चे जनरल बॉडी सदस्य रवींद्र भोईर, लाईफ मेंबर व न्हावे विद्यालयाचे मुख्याध्यापक प्रमोद कोळी, शिक्षक-पालक संघाचे सचिव देवेंद्र म्हात्रे, माता-पालक संघाच्या सचिव सारिका ठाकूर, गुरुकुल प्रमुख संदीप भोईर, ज्येष्ठ शिक्षक एकनाथ ठाकूर, सागर रंधवे, ज्येष्ठ शिक्षिका चित्रलेखा पाटील, ज्युनिअर कॉलेज विभागप्रमुख बाबुलाल पाटोळे आदी उपस्थित होते.

### नूतन कार्यकारिणी

**शिक्षक पालक संघ :-** गोवर्धन गोडगे (अध्यक्ष, पदसिद्ध), कुंदन राम मोकल (उपाध्यक्ष), देवेंद्र म्हात्रे (पदसिद्ध सचिव) नामदेव शंकर ठाकूर (सहसचिव, पुरुष), रूपाली जयेंद्र भगत (सहसचिव,स्त्री) **माता पालक संघ:-** गोवर्धन गोडगे (पदसिद्ध अध्यक्ष), कामिनी प्रमोद कोळी (उपाध्यक्षा), जिज्ञासा किशोर कोळी (सहसचिव), सारिका ठाकूर (पदसिद्ध सचिव), दिक्षा रमेश वर्तक (सहसचिव, विद्यार्थीनी प्रतिनिधी) आदी पदाधिकाऱ्यांची निवड सर्वानुमते करण्यात आली. विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे चेअरमन अरुणशेठ भगत यांनी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून काम पाहिले तर उपमुख्यद्यापक प्रमोद मंडले यांनी सहायक निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून काम पाहिले.

**चेअरमन अरुणशेठ भगत यांची प्रमुख उपस्थिती**



### नूतन पदाधिकारी, सदस्यांना आवाहन

**अध्यक्षीय भाषणामध्ये कार्यक्रमाचे अध्यक्ष आणि विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे चेअरमन अरुणशेठ भगत यांनी शिक्षक पालक संघातील सर्व नूतन पदाधिकारी आणि सदस्य यांचे अभिनंदन केले. यासोबतच शालेय गुणवत्ता विकासामध्ये आपल्या पाल्यांच्या शैक्षणिक समस्या आपण प्रभावीपणे मांडून शिक्षक आणि प्रशासनाबरोबर या समस्या सोडवण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन केले. यानंतर दहावी ब या वर्गातील विद्यार्थिनी जिविका पाटील हिने कराटे स्पर्धेत दुहेरी कांस्यपदक प्राप्त केल्याबद्दल तिचे अभिनंदन केले व विद्यार्थिनींनी स्वसंरक्षणासाठी अशा खेळांकडे वळणे अपेक्षित असल्याचे प्रतिपादन करून विद्यार्थिनींनी स्वतःचा बचाव करण्यासाठी आता स्वयंसिद्ध आणि आत्मनिर्भर होण्याची आवश्यकता प्रतिपादन केले.**

### विशेष सत्कार

दहावी ब गुरुकुल वर्गातील विद्यार्थ्यीनी जिविका पाटील या विद्यार्थिनीस पनवेल येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय कराटे स्पर्धेमधील दुहेरी कांस्यपदक प्राप्त केल्याबद्दल विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे चेअरमन अरुणशेठ भगत यांच्या हस्ते तिला प्रशस्तीपत्र, दोन कांस्यपदके आणि पुष्पगुच्छ देऊन तिचा या वेळी गौरव करण्यात आला.

विद्यालयाचे ज्येष्ठ शिक्षक रवींद्र भोईर यांनी निवडणूक कार्यक्रमाची रुपरेषा सांगितली. प्रास्ताविक देवेंद्र म्हात्रे यांनी केले तर सूत्रसंचालन करून आभार सागर रंधवे यांनी मानले.



**पनवेल : अभिनव युवक मित्र मंडळ पायोनिअरचा राजाच्या यंदाच्या ३४व्या वर्षाचे सजावटीचे वासापूजन झाले. यंदाही सामाजिक बांधिलकीद्वारे गणेशोत्सव साजरा होणार आहे. त्यानुसार मंडळाचे कार्याध्यक्ष नितीन पाटील यांच्यासह उपस्थितांच्या हस्ते पायोनियरच्या राजाच्या मंडपाचे पूजन झाले. या वेळी मंडळाचे अध्यक्ष रमेश चव्हाण, उपाध्यक्ष अल्पेश पाडावे, खजिनदार शैलेश कदम, सेक्रेटरी सचिन नाझरे, मंडळाचे सदस्य संजय कदम, महेश सरदेसाई, राजू सावंत, परेश बोरकर, रूपेश नागवेकर, मंगेश चंदने, प्रसाद कंधारे, संतोष लाड यांच्यासह सभासद उपस्थित होते.**



**पनवेल : भाजपचे युवा कार्यकर्ते रहीम लदाप यांना वाढदिवसानिमित्त उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी आणि तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी भाजपचे तालुका सरचिटणीस भूपेंद्र पाटील, सुनील पाटील, हेमंत माने, युवा मोर्चा तालुका सरचिटणीस विश्वजीत पाटील, चंद्रकांत नाईक, नाजीम शेख, मयुर कदम, मानवी पाटील आदी उपस्थित होते.**

# 'सीकेटी'च्या विद्यार्थ्यांचे कुष्ठरुग्णांसोबत रक्षाबंधन

### वृद्धाश्रमात फळे आणि आश्रमशाळेत शैक्षणिक साहित्याचे वाटप

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खांदा कॉलनीमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) आर्ट्स कॉमर्स अ‍ॅण्ड सायन्स कॉलेज (स्वायत्त) हे नेहमीच समाजाप्रती असणाऱ्या उत्तरदायित्वाप्रती सजग आणि संवेदनशील असते. ह्याच भावनेतून दरवर्षीप्रमाणे सीकेटी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने सोमवारी (दि. १९) कुष्ठरोग निवारण समिती, शांतीवन, नेरे येथे कुष्ठरुग्ण बांधवांसोबत रक्षाबंधन सण साजरा करून समितीच्या वृद्धाश्रमास मिष्ठाण व फळांचे वाटप केले. यासोबतच वाकडी येथील आदिवासी आश्रमशाळेत शैक्षणिक साहित्याचे वितरण करण्यात आले.







कार्यक्रमावेळी व्यासपीठावर कार्यक्रमाच्या प्रमुख अतिथी उषाताई जाधव, कुष्ठरोग निवारण समितीचे कार्याध्यक्ष प्रमोद ठाकूर, कार्यवाहक विनायक शिंदे, आणि सीकेटी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे मुख्य कार्यक्रम अधिकारी डॉ. सुर्यकांत परकाळे आदी उपस्थित होते. सुरवात आदिवासी आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांमार्फत सादर केलेल्या प्रार्थना आणि स्वागतगीताने झाले. समितीचे कार्यवाहक विनायक शिंदे यांनी, ऐतिहासिक दाखल्यांचे संदर्भ देत रक्षाबंधन दिनाचे महत्व विषद केले व त्यांनी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या समाजाभिमुख कार्याचे कौतुक करत, महाविद्यालयाशी असणाऱ्या घनिष्ठ ऋणानुबंधाचा उल्लेख केला.

राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे मुख्य कार्यक्रम अधिकारी प्रा.सुर्यकांत परकाळे यांनी जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे सामाजिक बांधिलकीशी असलेल्या दृढ निष्ठेचा उल्लेख केला. याबरोबर संस्थेच्या कार्यकारी मंडळाच्या सदस्यांचे तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो.डॉ.एस.के.पाटील ह्यांच्या प्रोत्साहनपर सहकार्याबाद्दल गौरवोद्गार उल्लेखित करून शांतीवन केवळ कुष्ठरोगाचे निवारण कार्य करीत नसून तरुण, युवा मनांवर संस्काराचे रोपण कार्य पार पाडत आहे, असे प्रतिपादन केले. तत्समवेत महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या स्वयंसेविकांनी आपली आपल्या संबोधनातून सबंध सभागृहास भावनिक साद घातली.

औपचारिक कार्यक्रमानंतर महाविद्यालयातील स्वयंसेवीकांनी कुष्ठरोगग्रस्त बांधवांना राखी बांधून त्यांच्याप्रती आपलेपणाची भावना उधृत केली. त्यानंतर समितीच्या वृद्धाश्रमास राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या कार्यक्रम अधिकारी व स्वयंसेवकांच्या उपस्थितीत मिष्ठाणाचे व फळांचे वाटप करण्यात आले. अंततः महाविद्यालयाच्या चमूने वाकडी येथील आदिवासी आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करून सामाजीक बांधिलकीचा संदेश दिला.

या कार्यक्रमाच्या यशस्वी नियोजनामध्ये महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो.डॉ.एस.के.पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे मुख्य कार्यक्रम अधिकारी डॉ. सुर्यकांत परकाळे, महिला कार्यक्रम अधिकारी डॉ. योजना मुनिव, कार्यक्रम अधिकारी प्रा.आकाश पाटील, प्रा. आलोक भानुशाली महिला कार्यक्रम अधिकारी प्रा. रुपाली पाटील, प्रा. पूजा दांदळे आणि एन.एस. एस. विषय शिक्षक प्रा. रूपेश माने यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.

### तक्का येथे नारळी पौर्णिमा उत्साहात

# टी-२० वर्ल्डकपची उभारली प्रतिकृती

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कोळी बांधवांचा नारळी पोर्णिमेचा सण सोमवारी (दि. १९) साजरा झाला. यानिमित्त तक्का ग्रामस्थ मंडळाच्या वतीने ढोल ताश्याच्या गजरात सोमवारी मिरवणूक काढण्यता आली.

यामध्ये पारंपरिक वेशभुषा करुन महिला, पुरुष मोठ्या उत्साहात सहभागी झाले हो. त्याचबरोबर तरुणांनी भारतीय क्रिकेट संघाची जर्सी घालून टी-२० विश्वचषकाची प्रतिकृती उभारली होती.

मिरवणुकीत माजी नगरसेवक अजय बहिरा, प्रभाकर बहिरा, युवा नेते प्रतिक बहिरा, स्वरूप मुंबईकर, आदित्य बहिरा, सिद्धेश बहिरा, चिराग बहिरा, कल्पेश वेलदोडे, मयुरेश बहिरा, स्वागत मुंबईकर, यधनेश भगत, पार्थ बहिरा, प्रणय बहिरा व कोळी बांधव उपस्थित होते.



## संपादकीय

# जनभावनेचा उद्रेक

पश्चिम बंगालमधील डॉक्टर तरुणीच्या बलात्कार आणि हत्या प्रकरणातील क्रौर्याने देशभरातील जनता सुन्न झालेली असताना पाठोपाठच लैंगिक अत्याचाराची अन्य प्रकरणे गेले दोन दिवस बातम्यांमधून लोकांसमोर आली. बदलापूरमधील शाळेतील चिमुरड्या मुलींवरील लैंगिक अत्याचार प्रकरणी पालक मंगळवारी आक्रमक झालेले दिसले तर जनक्षोभाच्या आडून विरोधकांनीही राजकीय खेळी साधण्याचा प्रयत्न केला.

**पश्चिम बंगालमधील तरुण महिला डॉक्टरच्या नशिबी ज्या पद्धतीने संशयास्पद वातावरणात क्रूर लैंगिक अत्याचार व दुर्दैवी अंत आला, त्याने देशभरातील जनता अस्वस्थ मन:स्थितीत आहे. नवी दिल्लीतील निर्भया बलात्कार प्रकरणानंतर ज्यातऱ्हेने अवघे जनमानस ढवळून निघाले होते, तशीच परिस्थिती आताच्या घडीला देशात आहे. त्यातच लैंगिक अत्याचाराची आणखी काही प्रकरणे एकापाठोपाठ एक समोर आल्याने की काय, जनतेचा यासंदर्भातील संयमाचा बांध फुटल्याचे बदलापूरमधील आंदोलनादरम्यान दिसले. बदलापूर पूर्व येथील एका नामांकित शाळेत दोन चिमुरड्या मुलींवर शाळेतील तरुण सफाई कामगाराने लैंगिक अत्याचार केल्याचे प्रकरण नुकतेच उजेडात आले. पालकांच्या तक्रारीची वेळीच दखल न घेतल्याचा आरोप तेथील स्थानिक पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ निरीक्षक महिलेविरोधात झाल्यानंतर या पोलीस अधिकारी महिलेची तेथून तातडीने अन्यत्र बदली करण्यात आली, परंतु त्याने पालकांचे समाधान झाले नाही. पालकांच्या दबावापोटी संबंधित शाळेने मुख्याध्यापिकेसह चौघांना निलंबितही केले, परंतु तरीही पालकांनी मंगळवारी शाळेविरुद्ध आंदोलनाचा पवित्रा घेतला. शाळेने माफीनामा सादर करून झालेली घटना अतिशय दुर्दैवी, घृणास्पद व निंदनीय असल्याची कबुली दिली व तपासकामात शाळेकडून संपूर्ण सहकार्य करण्याचे आश्वासनही दिले. संबंधित सफाई कामगार ज्या कंत्राटदारामार्फत आला होता, त्या कंत्राटदारासही शाळेने काळ्या यादीत टाकले. पालकांची जाहीर माफी मागून शाळेने त्यांना कायदेशीर मदत देऊ केली, परंतु याउप्परही मंगळवारी सकाळी साडेसहापासूनच शाळेसमोर व नंतर साडेदहा वाजल्यापासून बदलापूर स्थानकात रेल्वे रोको आंदोलन सुरू झाले. मुंबईहून येणाऱ्या व मुंबईकडे जाणाऱ्या अशा दोन्ही बाजूच्या वाहतुकीवर त्यामुळे परिणाम झाला. बलात्काऱ्याला तातडीने फाशीच दिले पाहिजे, अशी मागणी करत जमावाने रेल्वेरूळ अडवून धरले. लैंगिक अत्याचाराच्या घटनांमुळे जनता संतप्त असल्याचे चित्र दिवसभर वृत्तवाहिन्यांवर तसेच समाजमाध्यमांवरही दिसत राहिले. प्रारंभी पोलीस व रेल्वे सुरक्षा बलाच्या अधिकाऱ्यांनी आंदोलकांची समजूत काढण्याचा प्रयत्न केला. नंतर मंत्री व भाजपा नेते गिरीश महाजन यांनीही आंदोलकांची भेट घेतली व सरकार आंदोलकांच्या भूमिकेशी सहमत असल्याचे सांगून समजूत काढण्याचा प्रयत्न केला. याप्रकरणाच्या चौकशीसाठी सरकारने विशेष तपास पथक (एसआयटी) स्थापन केल्याची घोषणाही उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली, परंतु तरीही दुपारनंतर आंदोलनाला हिंसक वळण लागले. रेल्वे प्रवाशांची गैरसोय लक्षात घेऊन आंदोलन मागे घेतले जावे, अशी विनवणी करूनदेखील आंदोलक बधले नाहीत. अखेर पोलिसांना लाठीचार्ज करून आंदोलकांना पांगवावे लागले तर त्यानंतरही काही आंदोलकांनी पोलिसांवर दगडफेक केली. या साऱ्या प्रकारामुळे आंदोलकांआडून विरोधक राजकीय खेळी खेळत असावेत, असा संशयही स्वाभाविकच निर्माण झाला. बलात्काऱ्यांना तातडीने फाशीच दिले पाहिजे, अशी मागणी पश्चिम बंगाल आणि महाराष्ट्र अशा दोन्ही राज्यांमध्ये जनतेने आंदोलनाद्वारे लावून धरली. लैंगिक अत्याचारांच्या प्रकरणांत जलद गतीने खटले चालवून गुन्हेगारांना कठोर शिक्षा ठोठावली जावी या जनभावनेकडे राज्य तसेच केंद्रातील सरकारलाही आता लक्ष द्यावेच लागेल.**

# 'योजनादूत'मुळे रोजगार निर्मितीसह शासकीय योजनांचा प्रसार

युवांना रोजगार पुरविणे हे मुख्य उद्दिष्ट समोर ठेवून राज्य शासनामार्फत अनेक योजना सुरू करण्यात आल्या आहेत. त्यामध्ये नुकत्याच सादर झालेल्या अतिरिक्त अर्थसंकल्पात मुख्यमंत्री युवा प्रशिक्षण योजनेची घोषणा करण्यात आली होती. त्या अंतर्गतच राज्यात ५० हजार मुख्यमंत्री योजनादूत नेमण्यात येतील असेही घोषित करण्यात आले होते. त्याचा शासन निर्णय जारी करण्यात आला असून या योजनेमुळे राज्यातील युवांना रोजगार मिळण्यासह शासकीय योजनांचा तळागाळापर्यंत प्रसार होऊन पात्र लाभार्थ्यांना लाभ मिळण्यास मदत होणार आहे.

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग आणि मुख्यमंत्री जनकल्याण कक्ष यांच्यामार्फत संयुक्तपणे हा कार्यक्रम राबविण्यात येणार आहे. राज्य शासनाने हाती घेतलेल्या विविध योजना, उपक्रम, ध्येय धोरणे आदींची माहिती थेट ग्रामीण भागापर्यंत योजनादूतांच्या माध्यमातून पोहोचणार आहे. अंदाजे ३०० कोटी रुपये खर्च या कार्यक्रमासाठी येणार आहे.

कार्यक्रमाच्या अंमलबजावणीची जबाबदारी माहिती व जनसंपर्क महासंचालनालयावर असून योजनादूतांना कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाकडून मानधन देण्यात येणार आहे.

**प्रशासकीय यंत्रणा गतिमान होण्यास मदत**

राज्यात कार्यरत प्रशासकीय यंत्रणेला सहाय्य करण्याकरिता मुख्यमंत्री योजनादूत नेमले जाणार आहेत. राज्य शासनाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या विविध लोककल्याणकारी योजनांची प्रचार, प्रसिद्धी करून त्यांचा अधिकाधिक नागरिकापर्यंत लाभ पोहचविण्याकरिता मुख्यमंत्री योजनादूत थेट गावपातळीपर्यंत नेमण्यात येणार आहे.

ग्रामीण भागात प्रत्येक ग्रामपंचायतीसाठी एक व शहरी भागात पाच हजार लोकसंख्येसाठी एक योजनादूत या प्रमाणात एकूण ५० हजार योजनादूतांची निवड करण्यात येणार आहे. त्यांना प्रत्येकी १० हजार रुपये प्रती महिना एवढे ठोक मानधन देण्यात येणार आहे. निवड झालेल्या योजनादूतासोबत सहा महिन्यांचा करार केला जाणार आहे. हा करार कोणत्याही परिस्थितीत वाढविण्यात येणार नाही.

**योजनादूत निवडीकरिता पात्रतेचे निकष :**

उमेदवार १८ ते ३५ वयोगटातील असावा. तो कोणत्याही शाखेचा किमान पदवीधर असावा. त्याला



संगणकाचे ज्ञान असावे. त्याच्याकडे अद्ययावत भ्रमणध्वनी असावा. तो महाराष्ट्राचा अधिवासी असावा. त्याच्याकडे आधार कार्ड, त्याच्या नावाचे आधार संलग्न बँक खाते असावे.

**आवश्यक कागदपत्रे**

विहित नमुन्यातील मुख्यमंत्री योजनादूत कार्यक्रमासाठी केलेला ऑनलाईन अर्ज, आधारकार्ड, पदवी उत्तीर्ण असल्याबाबतची पुराव्यादाखल कागदपत्रे, प्रमाणपत्र असावी. सक्षम अधिकाऱ्यांनी दिलेले अधिवास प्रमाणपत्र, वैयक्तिक बँक खात्याचा तपशिल, पासपोर्ट आकाराचे छायाचित्र, ऑनलाईन अर्जासोबतच्या नमुन्यामधील हमीपत्र जोडणे आवश्यक आहे.

**नेमणूक प्रक्रिया**

उमेदवारांच्या नोंदणीची व प्राप्त अर्जाच्या छाननीची प्रक्रिया माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाद्वारे नियुक्त करण्यात आलेल्या बाह्यसंस्थांमार्फत पूर्ण करण्यात येणार आहे. ऑनलाईनरीत्या प्राप्त झालेल्या अर्जाची छाननी केल्यानंतर पात्र उमेदवारांची यादी प्रत्येक जिल्हा माहिती अधिकाऱ्यांकडे पाठविण्यात येणार आहे.

जिल्हा माहिती अधिकारी हे जिल्हा सहायक आयुक्त, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग व जिल्हाधिकारी यांनी प्राधिकृत केलेला प्रतिनिधी यांच्या समन्वयाने प्राप्त अर्जाशी संबंधित उमेदवारांच्या शैक्षणिक व वयोमर्यादेविषयक मूळ कागदपत्रांची तपासणी करणार आहेत. त्यानंतर प्रत्येक उमेदवाराबरोबर सहा महिन्यांचा करार केला जाईल.

जिल्हा माहिती अधिकारी शासकीय योजनांच्या माहिती संदर्भात पात्र उमेदवारांचे समुपदेशन व निर्देशन करतील. जिल्ह्यात ग्रामीण भागात प्रत्येक ग्रामपंचायतीसाठी एक आणि शहरी भागात पाच हजार लोकसंख्येसाठी एक या प्रमाणात उमेदवारांना योजनादूत म्हणून योजनांचा प्रसार व प्रसिद्धीकरीता पाठविण्यात येईल. उमेदवारांना सोपविण्यात आलेले कामकाज हे शासकीय सेवा म्हणून समजण्यात येणार नाही. या नेमणुकीच्या आधारे भविष्यात शासकीय सेवेत नियुक्तीची मागणी अथवा हक्क सांगितला जाणार नाही.

**योजनादूताने करावयाची कामे**

योजनादूतांनी जिल्ह्यातील योजनांची माहिती घेऊन नेमून दिलेल्या ठिकाणी समक्ष जात ठरवून दिलेले काम पार पाडणे त्यांच्यावर बंधनकारक राहील. योजनादूत राज्य शासनाच्या विविध योजनांची प्रचार आणि प्रसिद्धी करतांना ग्राम पातळीवरील यंत्रणांशी समन्वय करून शासनाच्या योजनांची घरोघरी माहिती होईल यासाठी प्रयत्न करतील.

योजनादूत सोपविलेल्या जबाबदारीचा स्वतःच्या स्वार्थासाठी किंवा नियमबाह्य कामासाठी उपयोग, गुन्हेगारी स्वरूपाचे गैरवर्तन आदी करत असल्याचे निदर्शनास आल्यास त्यांच्यासोबत करण्यात आलेला करार संपुष्टात आणण्यात येईल तसेच त्यांना जबाबदारीतून मुक्त करण्यात येईल. अनधिकृतरित्या गैरहजर राहिल्यास किंवा जबाबदारी सोडून गेल्यास त्याला मानधन अनुज्ञेय राहणार नाही.

**(साभार : माहिती व जनसंपर्क महासंचालनालय)**

# शेतीपंपाला मोफत वीजपुरवठा

मुख्यमंत्री बळीराजा वीज योजना घोषित करण्यात आली आहे. शेतकऱ्यांवर येणाऱ्या वीजबिलाचा भार उचलण्याचे शासनाने ठरविले असून राज्यातील जवळपास ४५ लाख शेतकऱ्यांच्या ७.५ अश्वशक्ती क्षमतेपर्यंतच्या शेती पंपांना पूर्णतः मोफत वीज पुरवली जाणार आहे.

मुख्यमंत्री बळीराजा वीज योजना ही पाच वर्षासाठी असून एप्रिल २०२४ ते मार्च २०२९पर्यंत राबविली जाणार आहे, मात्र तीन वर्षाच्या कालावधीनंतर या योजनेचा आढावा घेऊन पुढील कालावधीत योजना राबवण्याबाबत निर्णय घेतला जाईल. या योजनेमध्ये राज्यातील ७.५ अश्वशक्तीपर्यंत शेतीपंपाचा वापर करणारे सर्व शेतीपंप ग्राहक पात्र आहेत.

महाराष्ट्रात मार्च २०२४अखेर ४७.४१ लाख इतके कृषीपंप ग्राहक आहेत. या ग्राहकांना महावितरण कंपनीमार्फत वीजपुरवठा करण्यात येतो. एकूण ग्राहकांपैकी १६ टक्के हे कृषीपंप ग्राहक असून ऊर्जेच्या एकूण वापरापैकी सुमारे ३०% ऊर्जेचा वापर कृषी क्षेत्रासाठी होतो. कृषी ग्राहकांचा सध्याचा एकूण वार्षिक वीज वापर ३९,२४६ द.ल.युनिट आहे. प्रामुख्याने या विजेचा वापर कृषीपंपास वीजपुरवठा करण्यासाठी होतो. सद्यस्थितीत महाराष्ट्र राज्य नियामक आयोगाच्या निर्देशानुसार संपूर्ण राज्यात कृषी वाहिन्यांवरील शेतकऱ्यांच्या कृषी पंपांना रात्रीचा काळात १०/८ तास किंवा दिवसा आठ तास थ्री फेज विजेची उपलब्धता चक्राकार पद्धतीने करण्यात येते.

शासनास विद्युत अधिनियम २००३ कलम ६५ अन्वये कोणत्या ही ग्राहकांना किंवा ग्राहक वर्गवारीला अनुदान देऊन त्यानुसार अनुदानित वीज दर लागू करण्याचे अधिकार देण्यात आलेले आहेत. त्यानुसार वीज बिल माफ केल्यानंतर हे वीजदर सवलती पोटी रक्कम शासनाकडून वर्ग करण्यात येते. सध्या देण्यात येणारी वीजदर सवलत रुपये सहा हजार ९८५ कोटी अधिक वीज बिल माफीनुसार सवलत रुपये सात हजार ७७५ कोटी असे वार्षिक वीजदर सवलती पोटी प्रति वर्ष रुपये १४ हजार ७६० कोटी शासनाकडून शेतकऱ्याच्या हितासाठी खर्च होणार. ही योजना राबविण्याची जबाबदारी महावितरण कंपनीची असणार आहे. या निर्णयानुसार महावितरण कंपनीने तत्काळ या योजनेची अंमलबजावणी सुरू केली असून आता महाराष्ट्राचा बळीराजाची शेती ही सुजलाम सुफलाम होऊन राज्याची वाटचाल विकासाकडे होत आहे.

**–संजय डी. ओरके, विभागीय संपर्क अधिकारी, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय**

## बदलते तंत्रज्ञान

# फोन नीट धरा; अन्यथा करंगळी होईल वाकडी!

तुम्ही मोबाइल करंगळीने म्हणजेच हाताच्या सर्वांत लहान बोटावर धरत असाल तर काळजी घ्या. तुम्ही पिंकी, कार्पल टनल आणि क्युबाइटल टनल सिंड्रोमचे बळी ठरू शकता. यामुळे, बोटांची आणि हातांची रचना विकृत होऊ शकते. याने मेंदूशी संबंधित नसांवरही परिणाम होऊ शकतो. जबलपूरच्या नेताजी सुभाषचंद्र बोस मेडिकल कॉलेज हॉस्पिटलमध्ये अशी प्रकरणे नोंदवली गेली आहेत. मोबाईलची सवय अनेकांना लागली असून, याचा नकारात्मक परिणाम प्रत्येकाच्या शरीरावर होताना दिसत असल्याचे आतापर्यंतच्या अनेक अहवालांतून समोर आले आहे. जवळपास आता सर्वांच्याच हातात स्मार्टफोन आले आहेत, मात्र हा स्मार्टफोन आपण कसा हातात पकडतो यावर आपल्या हाताचे आरोग्य अवलंबून असल्याचे आता निदर्शनास आले आहे. याबद्दल फिजिओथेरपिस्ट डॉ. अजय फौजदार यांनी माहिती दिली आहे.



**केस १ : हात सुन्न पडतो**

कंपनीत काम करणारा तरुण (२५) सर्व कामे फोनद्वारे करतो. करंगळीवर फोन धरण्याची त्याला सवय झाली. त्यामुळे हात सुन्न पडायला सुरुवात झाली. मानेपासून पाठीपर्यंत वेदना सुरू झाल्या.

**केस २ : करंगळीवर पडला खड्डा**

१८ वर्षीय तरुणी करंगळीवर फोन ठेवून फोन वापरतो. यामुळे बोटांचे स्नायू कमकुवत झाले. करंगळीत वेदना होत होत्या. सतत करंगळीवर फोन पकडल्याने करंगळीवर खड्डा पडला.

**काय होते?**

प्रथम करंगळी वाकडी होण्यास सुरुवात होते. दुसरा टप्पा कार्पल टनल सिंड्रोम असतो. यात तळहात आणि मनगटावर वेदना निर्माण होतात. तिसरा टप्पा क्यूबाइटल सिंड्रोम धोकादायक आहे. यामध्ये बोटांवर ताण आल्याने हाताच्या संरचनेवर परिणाम होऊन स्नायू व मज्जातंतूंवर परिणाम होतो.


**मोबाइलचे वजन किती?**

सामान्य वजन ११३ ते १९८ ग्रॅम, सरासरी वजन १९९ ते ३०० ग्रॅम, अधिक वजन ३०१ ग्रॅमपेक्षा, कव्हरचे वजन ५० ते २५० ग्रॅम. मोबाइल करंगळीने जास्त वेळ धरून ठेवल्याने पिंकी, कार्पल टनल व क्यूबाइटल टनल सिंड्रोम होतो. वेदना कोपरपासून मानेपर्यंत पसरते. न्यूरोलॉजिकल आजाराचा धोकादेखील असतो.

# चित्रपट हास्य अभिनेते शरद तळवलकर

शरद तळवलकर हे मराठी चित्रपटांतील अभिनेते होते. आज त्यांचा स्मृतीदिन आहे. पु.ल. देशपांडे यांनी शरद तळवलकरांच्या अभिनयाचे मार्मिक वर्णन करून ठेवले आहे. ते म्हणतात, अभिनयातील सहजता हा दुर्मीळ गुण शरदमध्ये आहे. आपलं बोलणं विनोदी करायला त्याला कसलीही युक्ती वापरावी लागत नाही. नाटककाराने लिहिलेला संवाद पुरेसा हशा पिकवणारा नाही, या समजुतीने काही विनोदी नट आपली विनोदबुद्धी वापरतात, नको त्या ठिकाणी नको इतके अंगविक्षेप करतात. हशा पिकवण्यासाठी शरदला यापैकी कशाचीच गरज भासली नाही.

शरद गणेश तळवलकर यांचा जन्म नगर जिल्ह्यातील बोधेगाव येथे झाला. त्यांचे शालेय शिक्षण पुण्याच्या भावे हायस्कूलमधून झाले. शाळेत असताना ते शिक्षकांच्या नकला हुबेहूब करायचे. १९३५ साली 'रणदुंदुभी' नाटकात शिशुपालाची भूमिका करणारा कलाकार ऐन वेळी अडला आणि शरद तळवलकरांनी आपल्या अभिजात कलागुणांनी त्या भूमिकेत कमालीचा रंग भरला. तेव्हापासून दर वर्षी स्नेहसंमेलनाच्या नाटकात त्यांच्यासाठी आग्रह धरला जाऊ लागला. नटश्रेष्ठ केशवराव दाते यांच्या पाहण्यात त्यातील एक भूमिका आली आणि त्यांच्या 'नाट्य विकास' संस्थेत त्यांनी तळवलकरांना निमंत्रण दिले. नाटकात कामे करणे ही त्या काळात फारशी समाजमान्य गोष्ट नव्हती. वडिलांनी नाटक कंपनीत जाण्यास



**निमित्त**

विरोध केल्यानंतर नाटकाच्या वेडापायी शरद तळवलकरांनी घर सोडले.

अभिनयाबाबत मार्गदर्शन घेण्यासाठी तळवलकर कोल्हापूरला मा. विनायक यांच्या 'हंस पिक्चर्स'मध्ये बाबूराव पेंढारकरांना भेटले. त्यांच्या सल्ल्यानुसार त्यांनी आधी शिक्षण पूर्ण करायचे ठरवून जोडीला अकाऊंटंटची नोकरी पत्करली. महाविद्यालयाच्या नाटकांतूनही त्यांच्या भूमिका प्रेक्षकप्रिय झाल्या. व्यावसायिक नाटकांतून भादव्या, फाल्गुनराव, कामण्णा, तळीराम, धैर्यधर अशा भूमिका शरद तळवलकर करू लागले. १९५२ साली गाजलेल्या 'पेडगावचे शहाणे' आणि 'लाखाची गोष्ट' या राजा परांजपे दिग्दर्शित चित्रपटांत त्यांना छोट्या भूमिका मिळाल्या. तसेच, दत्ता धर्माधिकारी यांच्या 'अखेर जमलं' या चित्रपटात लक्षात राहण्याजोगी भूमिका मिळाली.

१९५५ साली आलेल्या 'करायला गेलो एक' या तुफान विनोदी फार्सने शरद तळवलकरांचे नाव महाराष्ट्रभर केले. तेथून त्यांची यशस्वी वाटचाल सुरू झाली. अभिनयाच्या वेडापायी त्यांनी पुणे विद्यापीठातील नोकरीही सोडली. पुढे राजा गोसावी यांच्याबरोबर 'अवघाची संसार', 'दोन घडीचा डाव' आणि 'याला जीवन ऐसे नाव' हे त्यांचे चित्रपट गाजले. 'रंगल्या रात्री अशा' (१९६२) या चित्रपटात शरद तळवलकरांना आव्हानात्मक भूमिका मिळाली. 'बायको माहेरी जाते' या चित्रपटातील त्यांची विनोदी भूमिकाही गाजली. अत्यंत सहज आणि उत्स्फूर्त अभिनय हे त्यांचे वैशिष्ट्य होते.

शरद तळवलकरांनी १९५१ साली कारवारला व्यावसायिक रंगभूमीवर 'संशयकल्लोळ'मधील सुभानराव सर्वप्रथम केला. 'अपराध मीच केला'मधील गोके मास्तर, 'दिवा जळू दे सारी रात'मधील पोस्ट मास्तर, या व्यक्तिरेखांबरोबरच 'एकच प्याला', 'भावबंधन', 'घरोघरी हीच बोंब', 'आप्पाजींची सेक्रेटरी' या नाटकांतील त्यांच्या भूमिकाही गाजल्या. असा हा चतुरस्त्र कलावंत अखेरपर्यंत रंगभूमीवर कार्यरत राहिला. 'डार्लिंग डार्लिंग', 'सखी शेजारिणी' आदी नाटकांचे प्रयोग सुरू असतानाच त्यांनी अखेरचा श्वास घेतला. विनोदाच्या आणि सहजसुंदर अभिनयाच्या प्रवासाला पूर्णविराम मिळाला.

**–अभिजित पेंढारकर**

**क्लिक...क्लिक...!**




**पनवेल : नारळी पौर्णिमेनिमित्त शहरातील उरण रोड येथील श्री कोळेश्वर कोळीवाडा चौकाला आकर्षक रोषणाई करण्यात आली होती. या ठिकाणी कोळी समाजातील मुला-मुलींनी पारंपरिक नृत्यही सादर केले.**

## आरोग्य प्रहर

# 'ही' आयुर्वेदिक वनस्पती चघळा, मधुमेहावर रामबाण

भारत हा मधूमेहाची राजधानी होणार आहे. एका सर्व्हेक्षणात भारतातील ४० वर्षांवरील व्यक्ती ही लठ्ठपणाची शिकार झाली आहे. त्यामुळे ब्लड प्रेशर आणि डायबिटीसमुळे अनेक जण आजारी आहेत. प्रत्येक व्यक्तीची प्रकृती एकसारखी नसते. डायबिटीजमुळे पिडीत व्यक्तीचा आहार देखील एक सारखा नसतो. डायबिटीज कंट्रोल करण्यासाठी शरीराला एक्टीव्ह ठेवणे गरजेचे असते. परंतू आयुर्वेदिक वनस्पतीमुळे शरीरातील शुगर कंट्रोल ठेवणे सोपे जाते. ज्येष्ठमधाची कांडी यासाठी रामबाण ठरु शकते. यात एंटीऑक्सीडेंट्स आणि पोषक तत्वे भरपूर असतात. चला तर पाहूयात ब्लड शुगर कंट्रोल ठेवण्यासाठी ज्येष्ठमधाच्या काड्या कशा फायदेशीर ठरतात.



**डायबिटीज रोखण्यासाठी ज्येष्ठमध (मुलेठी) फायदेशीर का आहे?**

शरीरात ब्लड शुगर कंट्रोल करण्यासाठी ज्येष्ठमध खूप महत्वाचे आहे. वास्तविक ज्येष्ठमधात एंटीऑक्सीडेंट्स भरपूर असते. डायबिटीज दरम्यान होणाऱ्या समस्या कमी करण्यासाठी ज्येष्ठमध वनस्पती खूप फायद्याची आहे. काही संशोधनानूसार ज्येष्ठमधाच्या काड्यांचे सेवन केल्याने सारखी सारखी साखर खाण्याची इच्छा कंट्रोल होते.

**कसे सेवन करावे?**

ज्येष्ठमधाच्या (मुलेठी) ब्लड शुगर लेव्हल काही प्रमाणात कमी होऊ शकते. तुम्ही रात्री झोपण्यापूर्वी तोंडात ज्येष्ठमधाच्या काड्या ठेवाव्यात. ज्येष्ठमधाच्या काड्यामुळे तुम्हाला साखर खाण्याची इच्छा होत नाही.

**ज्येष्ठमधाचा चहा**

ज्येष्ठमधाच्या चहा तयार करण्यासाठी १ कप पाणी घ्यावे, त्यात २ ते ३ ज्येष्ठमधाच्या काड्या टाकून चहा बनवावा. नंतर गाळून हा चहा घ्यावा त्याने ब्लड शुगरची लेव्हल कमी होईल

**ज्येष्ठमध (मुलेठी)**

एक बारमाही मिळणारे वनऔषधी आहे. याचे मूळ दक्षिण युरोप आणि पश्चिम आशियामध्ये आहे.वनस्पतीचे इंग्रजी नाव Glycyrrhiza glabra आहे. त्याचा ग्रीक भाषेतील अर्थ Glykys (गोड) आणि Rrhiza (रूट) या दोन शब्दांपासून बनलेला आहे.

**(ही माहिती सर्वसामान्य ज्ञानावर आधारीत आहे. अधिक माहीतीसाठी तुमच्या फॅमिडी डॉक्टरशी संपर्क करावा)**

# निवडणुकीसाठी कार्यकर्त्यांनी सज्ज व्हावे -सुरेश लाड

## भाजप खोपोली मंडळ कार्यकारिणीची बैठक



**खोपोली : प्रतिनिधी**

आगामी निवडणुकीत युती होईल, नाही होईल हा प्रश्न वरिष्ठ पातळीवरचा आहे, मात्र आपण कार्यकर्त्यांनी सदैव निवडणुकीसाठी तयार राहिले पाहिजे. केंद्र व राज्य शासनाच्या ज्या कल्याणकारी योजना आहेत त्यांची माहिती जनतेपर्यंत पोहचवण्याची जबाबदारी आपली असल्याचे भाजपचे ज्येष्ठ नेते माजी आमदार सुरेश लाड यांनी आवाहन केले.

भाजपच्या खोपोली मंडळाच्या विस्तारित कार्यकारिणीची बैठक लोहाना समाज हॉलमध्ये सोमवारी (दि.१९) आयोजित करण्यात आली होती. त्या वेळी सुरेश लाड बोलत होते. व्यासपीठावर खोपोली संपर्कप्रमुख सुनील घरत, जिल्हा सरचिटणीस दीपक बेहेरे, किसान मोर्चाचे जिल्हाध्यक्ष बडगुजर, कर्जत खालापूर निवडणूक प्रमुख किरण ठाकरे, खोपोली मंडळ अध्यक्ष रमेश रेटरेकर, सरचिटणीस राहुल जाधव, अजय इंगुलकर, युवा प्रमुख डॉ. निकेत पाटील, महिला मोर्चाध्यक्ष अश्विनी अत्रे यांसह पक्षाचे वरिष्ठ पदाधिकारी उपस्थित होते.

सुरेश लाड यांनी, मुख्यमंत्री लाडकी बहीण या योजनेला खूपच चांगला प्रतिसाद मिळत असल्याचे पाहून विरोधकांच्या पायाखालची वाळू सरकली असून ते निगेटिव्ह वातावरण निर्माण करण्याचा सातत्याने प्रयत्न करीत आहेत. तो प्रयत्न कार्यकर्त्यांनी हाणून पाडला पाहिजे. यासाठी केंद्र व राज्य शासनाच्या ज्या कल्याणकारी योजनांची माहिती घरोघरी जाऊन शासनाची भूमिका पटवून द्यावी, असे आवाहन केले. किरण ठाकरे यांनीही, युती होईल तो पुढचा विषय आहे, मात्र कार्यकर्त्यांनी सदैव निवडणुकीसाठी तयार राहणे गरजेचे असल्याचे पटवून दिले. दीपक बेहेरे यांनीही मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेच्या माध्यमातून आतापर्यंत ४२ लाख महिलांच्या खात्यात तीन हजार रुपये जमा झाल्याची माहिती दिली. विरोधकांनी मोठ्या प्रमाणात निगेटिव्ह वातावरण तयार केले आहे. ते खोडून काढण्यासाठी कार्यकर्त्यांनी समाज माध्यमावर सतर्क राहणे काळाची गरज असल्याचे सांगितले.

रमेश रेटरेकर, अश्विनी अत्रे, दिलीप पवार, डॉ. निकेत पाटील यांनीही खोपोली मंडळाच्या कार्याचा आढावा घेतला. संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भाजप जिल्हा कामगार आघाडीचे सूर्यकांत देशमुख यांनी केले.

बैठकीला ॲड. राजेंद्र येरुनकर, माजी अध्यक्ष इंदरमल खंडेलवाल, विजय तेंडुलकर, सुनील भालेराव, हिंमत मोरे, महिला आघाडीच्या सुप्रिया नांदे, विभावरी पाठक, स्नेहल सावंत, रसिका शेटे, हेमंत नांदे सुनील नांदे, सीमा मोगरे, सुमिती महर्षी, प्रल्हाद अत्रे, भाटिया भाजप शहर कार्यकारिणी, सर्व सेलचे सदस्य व कार्यकर्ते उपस्थित होते.

## वाहतूक पोलिसांची कारवाई

**अलिबाग :** बेदरकारपणे वाहने चालविणाऱ्या २८६ चालकांवरसोमवारी (दि.१९) वाहतूक शाखेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून कायदेशीर कारवाई करण्यात आली. त्यांच्याकडून दोन लाख २४ हजार ४०० रुपये इतका दंड आकारला आहे.


**अर्जंट पाहिजेत**

**पनवेल मधील बिल्डर फर्मसाठी अकाउंटेट पाहिजे, बी.कॉम. टॅली, ३-४ वर्षाचा अनुभव व ऑफिस बॉय पाहिजे.**

**संपर्क-८३५५८१७७१८/९८१९६९५७७४**


## पनवेल महानगरपालिका
## ई-निविदा सूचना

आयुक्त, पनवेल महानगरपालिका खाली नमूद कामांकरिता योग्य त्या वर्गात नोंदणीकृत ठेकेदारांकडून जाहीर निविदा बी - १ नमुन्यात मागवीत आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | कामाची अंदाजित रक्कम (Without GST) | अनामत रक्कम रुपये | निविदा प्रत किंमत + १८% विक्री कर = एकूण निविदा किंमत | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|---|
| १ | गणेशोत्सव २०२४ करीता पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती ब येथील सेक्टर-१२ कळंबोली गणेश विसर्जन घाट येथे गणेश मुर्ती विसर्जन करीता विंच मशीन बसविणे व विविध सुविधा पुरविणे. Tender No. PMC/ E/१३३/२०२४-२५ | ३.५६.४५६ | ३६००/- | ५०० + ९०= ५९० | १५ दिवस |
| २ | गणेशोत्सव २०२४ करीता खारघर सेक्टर-०६, भुखंड क्र.१० ए येथे कृत्रिम तलाव तयार करणे आणि विविध सुविधा पुरविणे. Tender No. PMC/ CE/१३२/२०२४-२५ | ४,१३,९९५ | ४२००/- | ५०० + ९०= ५९० | १५ दिवस |
| ३ | गणेशोत्सव २०२४ करीता खारघर सेक्टर-१२, भुखंड क्र.डी/३ येथे कृत्रिम तलाव तयार करणे आणि विविध सुविधा पुरविणे. Tender No. PMC/ CE/१३१/२०२४-२५ | ४,१३,९९५ | ४२००/- | ५०० + ९०= ५९० | १५ दिवस |
| ४ | गणेशोत्सव २०२४ करीता खारघर, सेक्टर-३६ मधील सिडको वसाहत स्वप्नपूर्ती आणि व्हॅली शिल्प सोसायटीजवळ कृत्रिम तलाव तयार करणे आणि विविध सुविधा पुरविणे. Tender No.PMC/ E/१२९/२०२४-२५ | ४,१३,९९५ | ४२००/- | ५०० + ९०= ५९० | १५ दिवस |
| ५ | गणेशोत्सव २०२४ करीता तळोजा फेज-२, सेक्टर-३७ धनश्री सोसायटीच्या बाजूला कृत्रिम तलाव तयार करणे आणि विविध सुविधा पुरविणे. Tender No. PMC/ CE/१३४/२०२४-२५ | ४,१३,९९५ | ४२००/- | ५०० + ९०= ५९० | १५ दिवस |
| ६ | गणेशोत्सव २०२४ करीता तळोजा फेज-२, सेक्टर-२३ गार्डन येथे कृत्रिम तलाव तयार करणे आणि विविध सुविधा पुरविणे. Tender No. PMC/ CE/१३५/२०२४-२५ | ४,१३,९९५ | ४२००/- | ५०० + ९०= ५९० | १५ दिवस |
| ७ | पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग समिती अ, खारघर मधील भोईरपाडा येथे गणेश विसर्जन घाट बांधणे. Tender No. PMC/ E/१३६/२०२४-२५ | २,९४,४२५ | ३०००/- | २००+ ३६= २३६ | १५ दिवस |

याकामी कोरी निविदा दिनांक २१/०८/२०२४ पासुन दि २९/०८/२०२४ पर्यंत सांय. ५.०० वाजेपर्यंत (कार्यालयीन वेळेत) बांधकाम विभागात उपलब्ध होतील.

१) अनामत रक्कमेचा डिमांड ड्राफ्ट निविदेसोबत लखोटा क्र. १ मध्ये सादर करण्याचा आहे.

२) सीलबंद निविदा दि. ३०/०८/२०२४ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत पनवेल महानगरपालिकेच्या बांधकाम विभागात स्विकारण्यात येतील.

३) प्राप्त झालेल्या निविदा शक्यतो दि. ३०/०८/२०२४ रोजी दुपारी ३.३० वाजता शहर अभियंता यांच्या दालनात उपस्थित ठेकेदार यांच्या समक्ष उघडण्यात येतील.

प्राप्त निविदेतील १ अथवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता मंजुर अथवा ना मंजुर करण्याचा हक्क पनवेल महानगरपालिकेने राखुन ठेवला आहे.

**सही/-**
**अतिरिक्त आयुक्त,I**
**पनवेल महानगरपालिका**

**जा.क्र.:-पमपा/जनसंपर्क./३१२४/प्र.क्र. ३७३/३७४ /२०२४**
**दिनांक :- २०/०८/२०२४**

## ॲमझॉन कंपनीचा माल चोरणाऱ्या त्रिकुटाला अटक



**खोपोली : प्रतिनिधी**

ॲमझॉन कंपनीच्या लोहप येथील गोडावूनमधील सुमारे तीन लाख ८२ हजार ६०० रुपये किमतीचा माल चोरून नेणाऱ्या संजय गंगा मंडल (सध्या रा. इंदिरानगर सर्कल, तुर्भे, मूळ बिहार), सुभाष लाले यादव (रा.इंदिरानगर सर्कल तुर्भे मूळ उत्तर प्रदेश) व महादू राजू उपले (रा. तुर्भे मूळ बुलढाणा) या तिघांना रसायनी पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. तिघांकडून चोरीला गेलेला मुद्देमाल आणि चोरी करण्यासाठी वापरलेला टेम्पो पोलिसांनी जप्त केला आहे.

रसायनी पोलीस ठाणे हद्दीत लोहप येथे ॲमझॉन कंपनीचे गोडावून आहे. ११ ऑगस्ट रोजी गोडावूनमध्ये चोरी झाल्याची तक्रार रसायनी पोलीस ठाण्यात दाखल झाली होती. रायगड पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, उपविभागीय पोलीस अधिकारी खालापूर विक्रम कदम यांच्या मार्गदर्शनाखाली रसायनी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संजय बांगर यांनी पथकाची नेमणूक केली होती. त्या अनुषंगाने तपास सुरू केला असता एक संशयित टेम्पो (एमएच ४३ सीई ५३९९)बद्दल माहिती मिळाली. या टेम्पोचा शोध लावण्यासाठी पोलीस पथकाने पासून नवी मुंबईपर्यंत मुख्य २८ सीसीटीव्ही तपासले. टेम्पो क्रमांकावरुन टेम्पोच्या मालकाचा शोध लागल्यावर टेम्पोमालकास ताब्यात घेऊन विचारपूस केली असता, त्याने त्याचा टेम्पो हा रात्रीच्या वेळी संजय गंगा मंडल यास पुठ्ठा वाहण्यासाठी भाड्याने देत असल्याचे सांगितले.

पोलिसांनी संजय मंडल यास ताब्यात घेतले. पोलिसी खाक्या दाखवताच त्याने त्याचे दोन साथीदार सुभाष यादव आणि महादू उपले यांच्या मदतीने चोरी केल्याचे कबुल केले. ही कामगिरी रसायनी पोलीस निरीक्षक संजय बांगर यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक प्रमोद हंबीर, महेश धोंडे, सहाय्यक उपनिरीक्षक लालासाहेब कोळेकर, हवालदार सचिन चौरे या पथकाने केली.

## काशिद समुद्रकिनारी पर्यटकांचे वाचवले प्राण



**मुरूड : प्रतिनिधी**

काशिद समुद्रकिनारी फिरण्यासाठी आलेले पुणे येथील पर्यटक पोहण्यासाठी समुद्रात उतरले होते. त्याच ठिकाणी दक्ष घालत असलेले पोलीस नाईक चेतन वेळे यांनी पोहण्यास उतरलेल्या पर्यटकांच्या तोंडात पाणी जात असलेले पाहिले. त्यांनी त्वरित सायरन वाजवून जीवरक्षक सोबत घेऊन पर्यटकांचे प्राण वाचवले.

पुणे येथील राजेश्री मिश्रा, संजय मिश्रा, आयुशी मिश्रा, बाही मिश्रा, सौम्य मिश्रा हे पाच जण आपल्या परिवारासह फिरण्यासाठी काशिद या ठिकाणी आले होते. सायंकाळच्या दरम्यान समुद्रात पोहण्यासाठी उतरले होते, परंतु नंतर पाण्याचा अंदाज न आल्याने काठावर येण्यासाठी पाण्यात धडपडत होते. दक्ष घालत असलेले पोलीस चेतन वेळे यांनी पाहिले. त्याच ठिकाणी असणारे जीवरक्षक राकेश रक्ते, शिवम लाड, सय्यम भोंबु, सुयोग महाडिक यांनी समुद्रात उड्या मारून या पाच पर्यटकांना वाचविले आहे.

पोलीस निरीक्षक उदय झावरे यांनी, समुद्रात पोहण्यासाठी उतरताना जीवरक्षक व पोलिसांकडून समुद्राची योग्य ती माहिती घेऊन व सेफ्टी जॅकेट घालून पोहण्यासाठी उतरावे. धोक्याच्या ठिकाणी उतरू नये. पर्यटकांनी उतावळेपणा करू नये, असे आवाहन केले आहे.

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यांत येत आहे की, आमचे अशिलांनी खालील परिशिष्टात वर्णन केलेली जमीन मिळकत ही सदर मिळकतीचे मूळ मालक यांच्याकडून कायम स्वरूपी मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे. सदर जमिन मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे-मालडुंगे, ता. पनवेल, जि. रायगड**

| अ. क्र. | सर्व्हे नं. | हि. नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. | मालकाचे नाव |
|---|---|---|---|---|---|
| १ | ८६ | १/ड | १-०४-०० पो.ख. ०-१०-०० एकूण १-१४-०० | १.०७ | श्री. हिरजी परबत गडा |

वरील वर्णन केलेली जमीन मिळकत अथवा तिच्या कोणत्याही भागावर यापूर्वी विक्री, देणगी, मक्ता, वहिवाट, ताबा, देखभाल, गहाण, कुळ इत्यादी कोणताही हक्क असलेल्या सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासहीत खाली सही करणारे यांचेकडे त्यांच्या खाली दिलेल्या पत्त्यावर पोहोचवावी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल करावा. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आम्ही सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करू व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारचा हरकती, तक्रारी, दावे आमचेवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरले जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

**पनवेल.**
**दिनांक :- २०/०८/२०२४**

**सही/-**
**ॲड. एस. के. राणे**
**पत्ता : ऑफीस नं. १२३, पहिला मजला, म्युन्सीपल कॉम्प्लेक्स, भाजी मार्केटजवळ, पनवेल, जि. रायगड,**
**मो.नं. ९८१९८६९२१२**

## नागोठण्यातील अतिक्रमणावर कारवाई करावी -किशोर म्हात्रे

**नागोठणे : बातमीदार**

नागोठणे ग्रामपंचायत हद्दीतील रिलायन्स सर्कलजवळ सार्वजनिक बांधकाम विभाग अलिबाग व रोहा विभाग यांच्या जागेवर रात्रीच्या वेळेत अगदी रस्त्यालगत काही नागरिकांकडून अतिक्रमण केले आहे. सार्वजनिक बांधकाम विभाग पेण यांनी हे अतिक्रमण येत्या १५ दिवसांत न हटविल्यास पेण बांधकाम विभाग कार्यालयावर मोर्चा काढून तीव्र जनआंदोलन छेडले जाईल, असा इशारा भाजप नेते किशोर म्हात्रे यांनी दिला आहे.

किशोर म्हात्रे यांनी सांगितले की, शासकीय जागेवर अतिक्रमण करणारा व्यक्ती जागा विकत घेतल्याचे सांगत आहे. याबाबत चौकशी होणे गरजेचे आहे. याबाबत उपअभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग पेण यांना त्यांच्या कार्यालयात जाऊन विचारणा केली असता, त्यांना फार आश्चर्य वाटले. त्यांनी संबंधित सर्व अतिक्रमणधारकांना सात दिवसांच्या आत अतिक्रमण हटवा अन्यथा आम्ही सर्व अतिक्रमण तोडून टाकू, अशी नोटीस पाठविली होती, परंतु नोटीस देऊन १५ दिवस उलटून गेले तरी अद्याप अतिक्रमण धारकांवर कुठलीही कारवाई झाली नाही. त्यामुळे गणेशोत्सवापूर्वी अतिक्रमण न हटविल्यास नागोठणे विभागातून भव्य मोर्चा काढण्यात येणार असल्याचा इशारा भाजप नेते किशोर म्हात्रे यांनी दिला आहे.

**आमच्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या जागेवर अतिक्रमण झाले आहे की नाही त्याबाबत आम्ही प्रत्यक्ष जागेवर जाऊन जागेची मोजणी करून पाहणी करू. त्यानंतर रिपोर्ट तयार करून आमच्या वरिष्ठाशी चर्चा करू. ज्यांनी अतिक्रमण केले आहे त्या सर्वांची अतिक्रमाणे तोडण्यात येतील.**

**-डी. एम. पाटील,**
**उपअभियंता, सा. बां. उपविभाग पेण**



**सिडको**
शहरांचे शिल्पकार

## जाहीर सूचना

सिडको महामंडळाच्या भूमी व भूमापन विभागातर्फे साडेबारा टक्के योजनेंतर्गत खालील तपशीलानुसार संबंधित भूधारकांना भूखंडाचे वाटप करण्याची प्रशासकीय कार्यवाही करण्यात येत असून, खालील तपशीलानुसार संबंधितांना भूखंडाचे **करारनामा / वाटपपत्र** प्रस्तावित आहे.

| अ. क्र. | गाव व संचिका क्र. | निवाडा क्र. | सर्व्हे क्र. | संपादित क्षेत्र | मंजूर पात्रता (चौ.मी.) | करारनामा करण्यात येणाऱ्या भूखंडाची माहिती | करारनामा संबंधित भूधारक व त्यांचे कायदेशीर वारसांची माहिती | संचिकेतील उपलब्ध माहिती व सद्य:स्थितीनुसार संपादित जमिनीशी संबंधित न्यायालयीन दाव्यांची माहिती |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ता. पनवेल, जि. रायगड | | | | | | | | |
| १ | तळोजा १०४५ | १/२००८ | २१८/१अ | ०-३२-० | ३०० चौ.मी. | **भुखंड क्र. १५० + १५१, सेक्टर-२, क्षेत्र-२९९.६२ चौ.मी.** | **श्री. हरी शंकर पाटील** | निरंक |
| २ | उलवे ४८३ | गव्हाण २३१ | ३८/१ | ०-१८-८ | १५० चौ.मी. | उलवे नोड येथील भूखंड क्र. C-१८, सेक्टर-८, क्षेत्र-१४९.९२ चौ.मी. | **कै. जर्नादन काना कोळी (मयत) यांचे वारस** १) श्री. पद्माकर जर्नादन कोळी, **२) कै. चिंतामण जर्नादन कोळी (मयत) यांचे वारस** २.१) श्रीमती वंदना चिंतामण कोळी, २.२) कु. रुतिका चिंतामण कोळी, २.३) कु. अनिशा चिंतामण कोळी व ३) श्री. महेंद्र जर्नादन कोळी | - |

उपरोक्त नमूद केलेल्या संचिकेसंदर्भात संबंधितांनी नोंद घ्यावी की, संबंधित संचिकेबाबत न्यायालयात त्यांचे हक्क प्रस्थापित करणारा दावा/हरकती प्रलंबित आहे, तसेच भूधारकांच्या नावाचा अथवा त्यांच्या कायदेशीर वारसांच्या नावाचा जाहीर सूचनेप्रमाणे प्रसिद्ध झालेल्या मजकूरात समावेश झालेला नसेल, अशा संबंधितांनी सदर जाहीर सूचना प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरुपात अर्ज सादर करण्याच्या ठिकाणी अर्ज व पूरक कागदपत्रांसह निदर्शनास आणावी. सदर अर्जासह पुरक कागदपत्रांची तपासणी करून वाटपपत्र करून देण्याबाबत पुढील योग्य कार्यवाही करण्यात येणार असून, अपूर्ण माहितीसह कागदपत्रांच्या अर्जाची दखल घेण्यात येणार नाही, याची संबंधितांनी नोंद घ्यावी, ही विनंती.

**अर्ज सादर करण्याचे ठिकाण :- मुख्य भूमी व भूमापन अधिकारी**
**सिडको भवन, तळ मजला,**
**सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४**

**अति. मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (पनवेल)**
**सिडको/जनसंपर्क/१८८/२०२४-२५**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in

# उरणमध्ये विजेचा लपंडाव

## बत्ती गुलमुळे नागरिक हैराण; महावितरणने उपाययोजना करण्याची मागणी

**उरण : प्रतिनिधी**

उरण पूर्वविभागात मोठ्या प्रमाणावर विजेचा लपंडाव सुरू असल्याने उरण परिसरातील नागरिक हैराण झाले आहे. त्यामुळे कित्येक नागरिकांच्या घरातील विद्युत उपकरणेदेखील खराब झालेली आहे. सतत होणाऱ्या वीज समस्येमुळे नागरिकांच्या दैनंदिन जीवनशैलीवरदेखील त्याचा परिणाम होत आहे.

विशेष म्हणजे दर दिवसाआड १२ ते १३ तास रात्री अपरात्री कधीही वीजपुरवठा खंडित केला जात असून, महावितरणाच्या अधिकाऱ्यांचा आणि कर्मचाऱ्यांचा मनमानीपणा सुरू आहे. यामुळे सर्वसामान्य जनता पिचली आहे. सतत वीज समस्या निर्माण होणे व रात्री अपरात्री वेळी अवेळी वीज पुरवठा खंडित होणे हे उरण पूर्व विभागातील नागरिकांच्या पाचवीलाच पुजले आहे. याशिवाय आत्ता सणासूदीच्या दिवसातही विज जैसे थे आहे. पावसामुळे परिसरात गवत वाढल्याने डासांचा प्रादुर्भाव वाढला आहे.

रात्री वीजपुरवठा खंडित झाल्यावर डास चावणे व झोपमोड होणे अशा समस्या निर्माण होत आहेत. उरण पूर्व विभाग परिसरात सर्व कष्टकरी जनता राहत असून, रात्री नीट न झोप झाल्यामुळे त्यांच्या दैनंदिन दिनचर्येवर परिमाण होत आहे. मंगळवारी देखभाल दुरुस्तीच्या कामी सकाळी ४ वाजता खंडित झालेला विद्युत पुरवठा संध्याकाळी सहा शिवाय सुरळीत होत नाही. तसेच दिवसा खंडित झालेला वीजपुरवठा रात्री १२ नंतर सुरळीत होत आहे. याशिवाय वीज मंडळाने मनमानी कारभार करत ३७ टक्के विजेच्या दरात वाढ केली आहे यामुळे परिसरातील नागरिक संताप व्यक्त करीत आहेत. त्याशिवाय वेळी अवेळी जाणाऱ्या वीज समस्येमुळे नागरिकांनी त्यांच्या मेहनतीने घेतलेली टीव्ही फ्रिज सारखी महागडी विद्युत उपकरणेदेखील खराब होत आहेत.याशिवाय फ्रीज मध्ये ठेवलेल्या वस्तू दूध भाज्या देखील खराब होत आहेत. या वीज समस्येमुळे परिसरातील नागरिक हैराण झाला आहे. पूर्वविभागात मोबाईलचे नेटवर्क व्यवस्थित नसल्यामुळे कित्येक नागरिकांनी घरात इंटरनेट वायफाय ची सेवा बसवून घेतली आहे. जेणेकरून त्यांना संपर्कात राहता येईल, मात्र वीज समस्येमुळे इंटरनेटची सेवादेखील बंद होत आहे.

याचा परिणाम नागरिकांच्या आयुष्यावर होत आहे त्यामुळे या वीज समस्येवर काहीतरी तोडगा काढावा, अशी मागणी उरण पूर्व विभागातील नागरिक करीत आहेत. यासंदर्भात महावितरणाचे अधिकारी विजय सोनावणे व प्रथमेश मयेकर यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता त्यांच्या माध्यमातून कोणताही प्रकारचा प्रतिसाद मिळत नाही. त्याचबरोबर वीज कधी सुरळीत होईल, या संदर्भात विचारणा केली असता, नेहमी आश्वासन दिली जातात एक तासात येईल दोन तासांत येईल मात्र १३ ते १४ तास उलटून देखील वीज समस्या सुरळीत होत नाही यामुळे नागरिक प्रचंड मेटाकुटीला येत आहे. उरण रेल्वे प्रकल्पासाठी विजेचा अधिक लोड घेतला जात आहे. त्यामुळे लाईन ट्रीप होत असल्याने वीज समस्या निर्माण होत आहेत, असे उपअभियंता महावितरण पूर्व विभाग उरणचे प्रथमेश मयेकर यांनी सांगितले होते.



### बिलेही येतात भरमसाठ

या अनियमित वीजपुरवठामुळे उरण पूर्व विभागात कित्येक नागरिकांनी इन्व्हर्टर घेतले आहेत, मात्र १५ ते २० हजार रुपयाला असणारे इन्वर्टर गोरगरीब व्यक्तींना परवडण्याजोगेदेखील नाहीत. वारंवार वीजपुरवठा खंडित होऊनदेखील विजेची बिलेही भरमसाठ येत आहेत.

**सतत जाणाऱ्या विजेमुळे आमच्या घरातली विद्युत उपकरणे खराब होत आहेत. त्याशिवाय फ्रिजमध्ये ठेवलेले अन्न भाज्या, दूध खराब होत आहे. रात्री अपरात्री जाणाऱ्या विजेमुळे झोपमोडदेखील होते.**
**–मनोहर म्हात्रे, कोप्रोली, उरण**

# पावसामुळे कळंबोली सर्कल परिसरातील रस्ता झाला चिकट

## शाम्पूच्या फेसाने अद्यापही कसरत

**कळंबोली : बातमीदार**

कळंबोली सर्कलमध्ये शनिवारी सकाळी दोन टेलरची समोरासमोर टक्कर होऊन जेएनपीटीकडे वाहून येणाऱ्या ट्रेलर मधील कंटेनर आपटल्याने त्यातील शाम्पू हा कळंबोली सर्कल मध्ये पसरला. त्यावेळेला मोठ्या वाहतूक कोंडीचा सामना नागरिकांना करावा लागला. कळंबोली अग्निशामक दलासह अन्य जवानांनी रस्त्यावर पडलेल्या शाम्पू पाच आगीच्या बोंबांनी धुवून काढला, मात्र या वेळेला मोठ्या प्रमाणावर कडकडीत ऊन पडल्याने शाम्पू हा तसाच रोडवर सुकला. यानंतर मंगळवारी पावसाची सुरूवात झाल्याने या शाम्पूमधून मोठ्या प्रमाणावर कळंबोली सर्कलमध्ये फेस जमा झाला. त्यामुळे रस्ता चिकट झाल्याने वाहनचालकांना मोठी कसरत करून वाहन चालवावी लागत आहेत.

अनेक वाहनचालक घसरून पडल्याने जखमीही झालेले आहेत. त्यामुळे रस्त्यावर पडलेल्या फेसाने वाहन चालकांच्या तोंडाला फेस आल्याचे आता बोलले जात आहे. जोपर्यंत मुसळधार पाऊस पडून सदरचा शाम्पू वाहून जात नाही तोपर्यंत या कळंबोली सर्कल मध्ये वाहनचालकांना या शाम्पूशी सामना करावा लागणार आहे.

१७ ऑगस्ट रोजी सकाळी कळंबोली सर्कलमध्ये समोरासमोर टक्कर झाल्याने मोठा ट्रेलर जमिनीवर उलटला. या ट्रेलरमधून थायलंड कडे जाणारा तब्बल २६ हजार किलो कॅस्टीन ऑइल म्हणजेच शाम्पू हा रस्त्यावर पसरला. अनेक वाहने घसरल्याने नागरिक ही जखमी झाले. या वेळी मोठी वाहतूक कोंडी झाली, अग्निशामक दल प्रमुख सौरभ पाटील यांनी पाच तासाच्या प्रयत्नाने सदरचा शाम्पू हा धुऊन काढला, मात्र या वेळी कडकडीत ऊन पडल्याने बाजूला राहिलेला शाम्पू हा सुकून तसाच राहिला. मंगळवारी दुपारपासून पावसाने पुन्हा रिपरिप सुरू केल्याने हा श्याम पूर्ण ओलसर झाला. त्यातून मोठ्या प्रमाणावर फेस निर्माण झाल्याने सर्कलच्या चारही बाजू कडून फेसच फेस वाहन चालकांना दिसू लागला. या फेसांमध्ये शाम्पूचा चिकटपणा असल्याने अनेक वाहन दुचाकी स्वार घसरल्याच्या घटना घडल्या. त्यामध्ये दुचाकी स्वार जखमी झाल्याचेही समोर आले आहे. आता कळंबोली सर्कलमध्ये सर्वत्रच शाम्पूच्या फेसाचा मोठा थर निर्माण झाला आहे. यातून मार्गस्थ करून या फेसाशी सामना करून वाहनचालकांना मार्गस्थ व्हावे लागत आहे. हा शाम्पू हा पुन्हा धुवून काढून कळंबोली सर्कल पूर्ण साफ करण्याची मागणी आता वाहनचालकांकडून करण्यात येत आहे, परंतु जर मुसळधार पावसाची सुरुवात झाली तर हा शाम्पू अनेक दिशांनी धुऊन जाण्याची शक्यता वाहन चालकांनी वर्तवली आहे, परंतु कळंबोली सर्कल मधून ये–जा करणाऱ्या दुचाकी व चार चाकी वाहनांना या शाम्पूशी सामना करीत मार्गस्थ व्हावे लागत आहे. याबाबत शासनाने कडक अंमलबजावणी करून कळंबोली सर्कल चिकटमुक्त करण्याची मागणी वाहनचालकांनी केली आहे.

# चिंचवली येथे आरोग्य तपासणी शिबिर

**पनवेल : वार्ताहर**

गेली ३५ वर्षे सातत्याने रोटरी क्लब ऑफ पनवेल सेंट्रलमार्फत आयोजित केली जाणारी वनवासी आश्रम विद्यार्थी आरोग्य दत्तक योजनेंतर्गत सालाबादप्रमाणे चिंचवली वनवासी कल्याण आश्रम येथील विद्यार्थी आरोग्य तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले.



या तपासणी शिबिरात विद्यार्थ्यांसह तेथील स्टाफचीदेखील तपासणी करण्यात आली. क्लबचे वैद्यकीय संचालक डॉ. लक्ष्मण आवटे यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. विजय भगत, डॉ. नितीन म्हात्रे, डॉ. रमेश पटेल, डॉ. आमोद दिवेकर, डॉ. राजेश गांधी, डॉ. प्रसन्ना चंद्रात्रे, डॉ. मिलिंद घरत यांचे सह अनेट डॉ. ऐश्वर्या पवार व डॉ. अक्षता कचरे यांनी विद्यार्थ्यांची तपासणी करून औषधोपचार केले तसेच दातांची निगा, मुखशुद्धी कशी राखायची याबद्दल डॉ. ऐश्वर्या यांनी मार्गदर्शन केले व डॉ. अक्षता यांनी शारीरिक तंदुरुस्ती कशी राखायची याचे मार्गदर्शन केले.

शिबिरास अध्यक्ष शैलेश पोटे, सचिव दिपक गडगे यांचे सह संचालक मंडळातील पदाधिकारी, अनेक क्लब सदस्य व ॲन्स उपस्थित होते.



**पनवेल : प्रभाग १८ मधील भाजप महिला कार्यकर्त्या पदाधिकाऱ्यांनी रक्षाबंधनानिमित्त पनवेल विधानसभा प्रमुख तथा माजी नगरसेवक नितीन पाटील यांच्यासह ओबीसी मोर्चा सोशल मीडिया जिल्हा प्रभारी प्रसाद हनुमंते आणि प्रभाग अध्यक्ष महेश सरदेसाई यांना राख्या बांधून आपले प्रेम व्यक्त केले. या वेळी माजी नगरसेविका नीता माळी, महिला मोर्चा प्रभाग अध्यक्षा संजीवनी खिल्लारे, स्वाती पवार, ज्योस्ना माळी, वैभवी गुरव, तबसून खान उपस्थित होत्या.**

# सीकेटी विद्यालयात रक्षाबंधन कार्यक्रम उत्साहात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे नवीन पनवेल येथील चांगू काना ठाकूर (सीकेटी) मराठी माध्यमिक विद्यालयात शनिवारी रक्षाबंधन कार्यक्रम उत्साहात साजरा करण्यात आला.



पाचवी ते दहावीच्या सर्व विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमात सहभाग घेतला. मुलींनी आपल्या भावांना राखी बांधून व आरती ओवाळून औक्षण केले. तर स्नेह स्वरूप भावांनी आपल्या बहिणीस चॉकलेट, भेटवस्तू, पेन देऊन स्नेह व्यक्त केला.

रक्षाबंधन म्हणजे हातातील राखीस साक्षी मानून आपल्या बहिणीचे सदैव रक्षण करण्याचे वचन देणे. आपल्यापेक्षा बलवान, समर्थ माणसाला राखी बांधून आपल्या रक्षणाचे वचन हीच यामागची भावना आहे असे सर्व वर्गशिक्षकांनी आपापल्या वर्गार्गातील विद्यार्थ्यांना सांगितले.

हा सण उत्साहाने साजरा करण्यासाठी विद्यालयातील स्वाती पाटील, हेमा रापते, ज्योती पाटील, राधिका शिर्के, सर्व वर्गशिक्षक व प्राचार्य कैलास सत्रे व पर्यवेक्षक कैलास म्हात्रे यांचे मार्गदर्शन लाभले.

# रक्षाबंधनाचे औचित्य साधून एक राखी सैनिकांसाठी उपक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिका आयुक्त मंगेश चितळे यांच्या प्रेरणेने, रक्षाबंधनाचे औचित्य साधून एक राखी सैनिकांसाठी हा नाविन्यपूर्ण उपक्रम पनवेल महानगरपालिकेच्या शाळा क्रमांक ५, जीवन शिक्षण विद्यामंदिर, मोठा खांदा पनवेल येथे घेण्यात आला.



अतिरिक्त आयुक्त भारत राठोड यांच्या सहकार्याने तसेच शिक्षणाधिकारी रमेश चव्हाण व अधीक्षक शिक्षण विभाग किर्ती महाजन यांच्या मार्गदर्शनाखाली सैनिकांच्या प्रति आदर व स्नेह व्यक्त करण्यासाठी तसेच त्यांच्या दीर्घायुष्यासाठी शाळा क्रमांक ०५ जीवन शिक्षण विद्यामंदिर मोठा खांदा, पनवेल या शाळेतील विद्यार्थ्यांनी व शिक्षकांनी स्वतः राख्या तयार केल्या.

मुख्याध्यापिका शुभा आवाड यांनी दीप्ती अंबावणे, सुनीता बडे,अंजली देसाई, निलोफर शेख, देवांगना मुंबईकर,जयश्री खांडेकर या सर्व शिक्षकांच्या मार्गदर्शनखाली विद्यार्थ्यांनी राख्या तयार केल्या. या उपक्रमास विशेष सहकार्य व समन्वय शाळेतील उपक्रमशील शिक्षक ज्ञानेश रामचंद्र आलदर यांनी केले.विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या या राख्या राजस्थान मधील कोटा येथील सीमेवरील सैनिकांना पाठविण्यात येणार आहेत.

# युवा कार्य प्रशिक्षण योजनेंतर्गत रोजगार

## नवी मुंबई पालिका मुख्यालयात उद्या शिबिर

**नवी मुंबई : बातमीदार**

कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या 'मुख्यमंत्री युवा कार्यप्रशिक्षण' योजनेबाबत शासन निर्णय क्र. संकीर्ण – २०२४ /प्र.क्र.९०/व्यशि–३, ९ जुलै, २०२४ नुसार नवी मुंबई महापालिका क्षेत्रातील हॉटेल्स, जाहिरात व अभियांत्रिकी इ. खासगी आस्थापनांवर सहा महिन्यांच्या कालावधीकरीता शिकाऊ उमेदवार म्हणून प्रशिक्षण देणेकामी विविध संवर्गातील एकूण २०६ पदांसाठी आवश्यक शैक्षणिक अर्हता धारण करणाऱ्या इच्छुक उमेदवारांकडून २१ ऑगस्ट २०२४ पर्यंत अर्ज मागविण्यात येत आहेत.

याकरिता शिकाऊ उमेदवारांना प्रतिमहिना विद्यावेतन शासनामार्फत देण्यात येईल. यामध्ये – शैक्षणिक अर्हता १२ वी पास : ६००० रुपये तसेच आय.टी.आय./पदविकाधारक : ८००० रुपये आणि पदवीधर / पदव्युत्तर पदवीधारक : १०००० रुपये याप्रमाणे विद्यावेतन राहील.



# सारसोळे जेट्टीवर नारळी पौर्णिमेचा उत्साह

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

कोळवाणी माता, सारसोळे गाव ग्रामस्थ आयोजित नारळी पौर्णिमेनिमित्त नेरुळ येथील सारसोळे गाव जेट्टी येथे स्थानिक आमदार मंदा म्हात्रे यांनी उपस्थित राहुन दर्या राजाला नारळ अर्पण केला .

माझ्या कोळी बांधवांना वादळी वाऱ्यांपासून संरक्षण कर व दर्याची दौलत जाळीमध्ये पडू दे आणि धंद्याला भरखत येऊ दे अशी प्रार्थना आमदार म्हात्रे यांनी केली.

या वेळी माजी नगरसेवक सूरज पाटील, माजी नगरसेवक दशरथ भगत, परशुराम मेहेर, गणेश भगत, मनोज मेहेर, सूर्यकांत तांडेल, धीरज कोळी, अमोल मेहेर, अजित म्हात्रे, संदीप मेहेर, हितेश गामी, सुहासिनी नायडू, तसेच सारसोले गावातील असंख्य कोळी बांधव उपस्थित होते.



**पनवेल : माजी पंचायत समिती सदस्य रत्नप्रभा घरत यांनी व त्यांच्या बहिणी तुळसाबाई घरत, चंद्रभागा घरत, अनुसया वास्कर यांनी रक्षाबंधनानिमित्त भाऊ श्रीधरशेठ ठाकूर, पांडुरंग ठाकूर यांना राखी बांधली. यासोबतच कियारा (कुहू) राहुल घरत या चिमुकलीने भाऊ कौस्तुभ घरत, मयंक घरत, श्वेत घरत यांना राखी बांधली.**

राम प्रहर

श्रावणधारा

## श्रावणाची सर

श्रावणची सर आली, सणासुदीची नभात
मेघदूत पोचवती, ख्याली खुशालीची बात

माय वाट पाहे दारी, लेक नांदावया गेली
बंधू येईल मुल्हारी, घेवुनिया साडीचोळी

नागपंचम सरली, पीकं टरारून आली
गर्द– गर्भार धरती, हिरवी चढली झळाळी

नभ कोसळे धबाबा, नदी नाले भरलेले
राखी पुनवेला बंधू, तुझे प्रेम पांघरले

वेध गोपाळ काल्याचे, कान्हा नाचतो माहेरी
माझ्या बंधूच्या संसारी, वेल आता फुलारली

मी ही होईन पीठोरी, तुझ्या येईन दारात
पुन्हा माहेर पाहीन, माय तुझ्या मी कुशीत

ओढ लागते जीवाला, मनी वाटे हूरहूर
पुसते मी तुला बापा, का रे दिले मला दूर



–डॉ. अविनाश पाटील
खांदा कॉलनी, पनवेल

# सेंद्रिय शेतीला मिळणार प्रोत्साहन

## माणगावमध्ये डॉ. पंजाबराव देशमुख जैविक शेती मिशन योजनेला सुरुवात

**माणगाव : प्रतिनिधी**

शेतीमध्ये सातत्याने होत असलेला रसायनांचा अतिरिक्त वापर, त्यामुळे खालावलेला जमिनीचा पोत तसेच, रासायनिक किटकनाशकाच्या फवारणीचे मानवी आरोग्यावर होत असलेले दुष्परिणाम याला पर्याय म्हणून सेंद्रिय शेतीस चालना देण्यासाठी डॉ. पंजाबराव देशमुख जैविक शेती मिशन या योजनेची सुरुवात कृषि विभागमार्फत माणगाव तालुक्यात करण्यात आली आहे.



यासाठी तालुक्यातील सेंद्रिय शेतीवर लक्ष केंद्रित करून त्याबाबतची शेतकऱ्यांची जनजागृती, शिबिरे, मार्गदर्शन शेतकऱ्यांना दिले जाणार असून सेंद्रिय शेतीमुळे घटत चाललेल्या पिकाच्या उत्पादनात मोठी वाढ होणार असून शेतकऱ्यांना सेंद्रिय शेती करण्यासाठी त्यांचा सहभाग वाढवत त्यांना प्रोत्साहन दिले जाणार आहे.

या योजनेचा कालावधी तीन वर्षांचा असणार आहे. ही योजना १०० टक्के अनुदानावर राज्य शासनाची महत्त्वाकांक्षी योजना असल्याने मोठ्या प्रमाणात शेतीचे क्षेत्र सेंद्रिय शेतीमध्ये रूपांतरित करण्यात येणार आहे.

यासाठी कृषी विभाग वेगवेगळ्या योजनांतून शेतकऱ्यांना मदत करणार आहे. डॉ. पंजाबराव देशमुख जैविक शेती मिशन, राष्ट्रीय नैसर्गिक शेती अभियान, मोठ्या क्षेत्राचे प्रमाणीकरण व कृषी विकास योजनेतून सेंद्रिय शेतीच्या प्रसारासोबतच त्यातील शेतीमालाच्या वितरणासाठी व्यवस्था निर्माण करण्यात येईल. यामुळे रसायन अवशेषमुक्त फळे, भाजीपाला आणि अन्नधान्य उपलब्ध होईल. सेंद्रिय शेतीसाठी कमी खर्चाचे तंत्रज्ञान विकसित करून शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविणे, पिकांचे अवशेष वापरून शेतातच सेंद्रिय शेती निविष्ठा तयार करण्याची प्रणाली विकसित करणे, तिचा इतरत्र प्रसार करणे, शेतकऱ्यांना दर्जेदार सेंद्रिय निविष्ठा योग्य पद्धतीने वापरण्याचे तंत्रज्ञान उपलब्ध करणे, सेंद्रिय शेतमालाच्या वितरणासाठी बाजारपेठ आणि स्वतंत्र विक्री व्यवस्था निर्माण करणे, सेंद्रिय शेतीमालाच्या निर्यातीस प्रोत्साहन देणे, सहभाग हमी पद्धतीने सेंद्रिय शेतीचे गट प्रमाणीकरण करून घेणे आदी योजनेची उद्दिष्टे असतील. या योजनेत सेंद्रिय शेती करणाऱ्या शेतकऱ्यांच्या उत्पादक कंपनीची देखील नोंदणी करण्यात येईल.

योजना एक किंवा सलग क्षेत्र असलेल्या गावात किमान १० हेक्टर ते ५० हेक्टर क्षेत्राचा एक गट तयार करावा लागेल. एका शेतकऱ्याला जास्तीत जास्त दोन हेक्टरपर्यंत लाभ दिला जाईल. त्यासाठी एक गट प्रवर्तक, गट मार्गदर्शक व तज्ज्ञ प्रशिक्षकाची निवड केली जाईल. सहभागी शेतकऱ्यांना लागवड ते काढणीपर्यंत प्रशिक्षणे दिली जातील. सेंद्रिय शेतीसाठी लागणाऱ्या सर्व निविष्ठा कशा तयार कराव्यात, याबाबत प्रशिक्षण दिले जाईल. शेतीचे प्रमाणीकरण करून शेतीमालाचे ब्रँडिंग केले जाईल. सहभागासाठी तालुका स्तरावरील कृषि सहाय्यक व आत्मा यंत्रणेचे तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक यांच्याशी संपर्क साधावा. योजनेमध्ये २०२४-२५ या वर्षासाठी माणगाव तालुक्यासाठी ५०० हेक्टर क्षेत्राचा लक्षांक प्राप्त असून गट तयार करण्याची कार्यवाही सुरू आहे.

**या योजनेंतर्गत लागवड ते काढणी, ब्रँडिंग व मार्केटिंग, प्रमाणीकरणापर्यंत शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात येईल तरी, माणगाव तालुक्यातील प्रगतशील शेतकरी, महिला शेतकरी, आदिवासी शेतकरी, शेतकरी गट यांनी जास्तीत जास्त सहभागी होण्याचे आवाहन कृषी विभागामार्फत करण्यात येत आहे.**

**-अजय वगरे, तालुका कृषि अधिकारी, माणगाव**

## निवडक

### जन्मांतर एक रहस्य कादंबरीचे प्रकाशन



**अलिबाग** : अतिश म्हात्रे यांनी लिहिलेल्या जन्मांतर एक रहस्य या कादंबरीचा प्रकाशन रविवारी (दि.१८) पार पडला. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान एनकेजीएसबी बँकेच्या अध्यक्ष सीए हिमांगी नाडकर्णी यांनी भूषविले. या वेळी चिंतामणी नाडकर्णी, एनकेजीएसबी बँकेचे उपाध्यक्ष सीए शांतेश वर्टी, सुषमा वर्टी, रोहा मुरूड नगरपालिका सीईओ पंकज भुसे, विश्वास परांजपे, स्मिता परांजपे, आरती म्हात्रे, तसेच त्यांचे सर्व कुटुंबीय उपस्थित होते. अतिश म्हात्रे यांना लहानपणापासून ज्यांनी घडवले त्यांचा सत्कार या वेळी करण्यात आला. कादंबरीची प्रस्तावना आणि मनोगत वाचन सिमंतीका वस्त-मोरे यांनी केले व नरेंद्र बोंबटकर यांनी सूत्रसंचालन केले.

### नारळी पौर्णिमा उत्साहात साजरी

**माणगाव** : तालुका रिक्षा चालक-मालक संघटनेतर्फे नारळी पौर्णिमा सण सोमवारी (दि.१९) उत्साहात साजरा करण्यात आला. पोलीस निरीक्षक निवृत्ती बोऱ्हाडे यांच्या हस्ते नारळाची पूजा करण्यात आली. या वेळी संघटनेचे तालुकाध्यक्ष संजय साबळे, नगराध्यक्ष ज्ञानदेव पवार, सामाजिक कार्यकर्त्या शर्मिला सत्वे, पोलीस शिपाई रामनाथ डोईफोडे, संभाजी रणवीर, वाहतूक पोलीस सहाय्यक फौजदार निलेश कदम, संघटनेचे नवीन एसटी स्टॅन्डचे विशेष सल्लागार हुसेन आकुस, नरेश सावंत, पांडुरंग गुजर, अध्यक्ष संतोष सावंत, उपाध्यक्ष जमाल पिलपिले, उपाध्यक्ष लियाकत रहाटविलकर, सचिव प्रशांत खरे,खजिनदार निलेश आडीत, माजी अध्यक्ष पराग सावंत, सभासद राजेश बक्कम, सुनील भोनकर, विजय पवार, सुनील दासगावकर, दिनेश मुंढे, अजिंक्य खाडे आदींसह सर्व रिक्षा चालक-मालक उपस्थित होते. गाडी सजवून नारळाची वाजत गाजत मिरवणूक काढण्यात आली. सायंकाळी काळ नदीच्या पात्रात नारळाचे उत्साहात विसर्जन करण्यात आले.





**माणगाव : बहीण-भावाचे पवित्र नाते जपणारा रक्षाबंधन सण उत्साहात साजरा करण्यात आला.** (छाया : सलीम शेख)

# माथेरानच्या शाळेची केंद्रस्तरावर बाजी

**माथेरान : प्रतिनिधी**

सन २०२३-२४मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा योजने अंतर्गत मुख्यमंत्री माझी सुंदर शाळा अभियान राबविण्यात आले होते. या स्पर्धेत माथेरानमधील वीर हुतात्मा भाई कोतवाल नगर परिषद प्राथमिक शाळेने केंद्र स्तरावर प्रथम क्रमांक पटकावला आहे.

जवळपास ९५ टक्के विद्यार्थी म्हणजेच शाळांमधील सुमारे दोन कोटी विद्यार्थी याअभियानांतर्गत उपक्रमात सहभागी झाले होते. यामुळे हे अभियान मोठ्या प्रमाणावर यशस्वी ठरले आहे. अभियानातील काही उपक्रमांची नोंद गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये देखील करण्यात आली आहे. या अभियानात तालुका जिल्हा व राज्यस्तरावर यशस्वी झालेल्या शाळांना रोख रकमेच्या स्वरूपात बक्षीस देण्यात आली आहेत. वीर हुतात्मा भाई कोतवाल या शाळेला केंद्र स्तरावर प्रथम क्रमांक मिळाल्याबद्दल स्थानिकांनी शिक्षक व विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.



**मागील अनेक दिवसांपासून शिक्षक वर्गाने घेतलेल्या मेहनतीचे हे फळ आहे. शाळेचे मुख्याध्यापक दिलीप अहिरे आणि त्यांचे सर्व सहकारी अनेक नावीन्यपूर्ण उपक्रम राबवित असतात. मुलांना पुस्तकी अभ्याक्रमाबरोबर सामाजिक उपक्रमावर भर घालतात. त्यामुळे सर्व शिक्षक वर्गाचे अभिनंदन!**
**-राजेश चौधरी, सरचिटणीस, भाजप माथेरान**

**मुख्याधिकारी तथा उत्तम प्रशासक राहुल इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली शाळेने अभियानात सहभाग घेतला. सर्व शिक्षकवर्ग आणि पालक यांनी याकरिता योगदान दिले.आपली शाळा यापुढे गुणात्मक कामगिरी करून आदर्श नागरिक घडविण्यासाठी प्रयत्नशील आहे.**
**-दिलीप अहिरे, मुख्याध्यापक**

नियमित वाचा 'रामप्रहर'


### जाहिर नोटीस

तमाम जनतेस या जाहिर नोटीसीने कळविण्यात येत आहे की, आमचे अशिल यांनी खालील वर्णन केलेल्या मिळकतीचे जमिन मालकांबरोबर बोलणी करून सदर मिळकत खरेदी करण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे आष्टे, तालुका पनवेल, जिल्हा रायगड येथील सर्व्हे नं. १०३, १०४, १०६, १०७/१, १०७/२, १०८, १३२ आणि १३३** या जमिनींमध्ये पाडण्यात आलेल्या भुखंडांपैकी **भुखंड क्रं. १३, क्षेत्रफळ ३४० चौ.मी., हा भुखंड सहयाद्री को.ऑप. हौसिंग सोसायटी लि. अंतर्गत असून सोसायटीने दिलेले भाग प्रमाणपत्र क्रं. १३, ज्यामध्ये ५६ ते ६० असे प्रत्येकी रू.५०/- चे ५ भाग सहित, अशा भुखंडाचा विक्री व कायम हस्तांरतणाचा व्यवहार**.

वर वर्णन केलेल्या मिळकतीच्या ७/१२ उता-यावर मालक/भोगवटदार अशी नावे असलेल्या व्यक्ती म्हणजेच **सहयाद्री को. ऑप. हौसिंग सोसायटी लि.तर्फे नोंदणीकृत सदस्य/सभासद सौ. कल्पना सुधीर कावळे,** राहणार ३०४, आर्टिका सी, लोधा अॅक्वा, महाजन वाडी, वेस्टर्न एक्सप्रेस, हायवे मिरारोड, मिरा भाईंदर, ठाणे ४०११०७, यांच्या नांवाची नोंद आहे, तरी सदर व्यवहाराबाबत वर वर्णन केलेल्या मिळकतीशी कोणाही व्यक्तीचा गहाण, दान, बक्षिस, वारसाहक्क, वहिवाट, साठेकरार, खरेदीखत, भाडेपट्टा, पोटगी, एम. ओ.यु अथवा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्या व्यक्तिीने वर नमुद केलेल्या हक्काबाबत त्यांच्याजवळ असलेल्या योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांपर्यंत खालील पत्त्यावर लेखी हरकत घ्यावयाची आहे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत नोंदविली नाही तर, वर नमुद केलेला व्यवहार पुर्ण केला जाईल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

पनवेल.
दि.२१/०८/२०२४

**सही/-**
**अॅड. निलम वैभव विभुते**
**पत्ता ऑफिस नं. १३, यशोकिरण को.ऑप.हौ.सो.,**
**सेशन अॅण्ड डिस्ट्रीक्ट कोर्टजवळ, सावरकर चौक,**
**पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड ४१०२०६**
**मो.नं. ७२४९७७७७७७**


# कर्जतध्ये मुस्लिम बांधवांचे उपोषण स्थगित

**कर्जत : प्रतिनिधी**

शहरातील मुस्लिम धर्मीयांच्या कब्रस्थानमध्ये अनोळखी मृतदेह गाडले जात आहेत. त्यामुळे मुस्लिम धर्मीयांनी सोमवारपासून उपोषण सुरू केले होते. उपोषणाच्या दुसऱ्या दिवशी मंगळवारी (दि.२०) नगर परिषद मुख्याधिकारी वैभव गारवे आणि पोलीस निरीक्षक सुरेंद्र गरड यांच्याशी चर्चा करून सकारात्मक निर्णय होईल, असे आश्वासन दिल्याने उपोषण तात्पुरते स्थागित करण्यात आले आहे.



येथील मुस्लिम धर्मीयांच्या करब्रस्थान येथे बेवारस प्रेत गाडले जात होते. त्याविरूद्ध युसुफ खान आणि लियाकत अली इबाद खान यांनी कर्जत येथील लोकमान्य टिळक चौक येथे उपोषण सुरू केले होते.

मुस्लिम धर्मीयांनी सुरू केलेल्या उपोषणाचा चौकशी अहवाल लवकरात लवकर दिला जाणार अशी भूमिका नगरपालिका प्रशासन आणि कर्जत पोलीस स्टेशन यांनी चर्चासाठी बोलावणार आहेत, तसेच संबंधित माहिती पालिका वक्फ बोर्डाला कळविण्यात येईल, असे स्पष्ट केले आहे.

मुस्लिम समाजाला समाधानकरार उत्तर अपेक्षित आहे. अन्यथा मुस्लिम धर्मीय हे अलिबाग येथे पोलीस मुख्यालयासमोर उपोषण करणार आहेत.

# चौक येथे आपत्कालीन मदत प्रशिक्षण

**खोपोली : प्रतिनिधी**

अपघातग्रस्तांच्या मदतीसाठी सामाजिक संस्था आणि लाइफगियर सेफ्टेक प्रायव्हेट लिमिटेड यांच्या संयुक्त विद्यमाने चौक ग्रामीण रुग्णालयात आपत्कालीन मदत प्रशिक्षण शिबिर आयोजित करण्यात आले होते. प्रात्यक्षिकासह सविस्तर मार्गदर्शन अपघातग्रस्तांच्या मदतीसाठी सामाजिक संस्थेचे गुरुनाथ साठेलकर, लाइफगियर सेफ्टेक प्रायव्हेट लिमिटेडचे पंकज बागुल आणि सौरभ घरत यांनी केले. डॉ. सविता कालेल, विजय भोसले, अमित गुजरे आणि ग्रामपंचायतीचे सदस्य निखिल मालुसरे हेदेखील शिबिरात सहभागी झाले होते.



# माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा उत्साहात

**माणगाव : प्रतिनिधी**

इंग्लिश स्कूलच्या २००२ दहावीतील बॅचच्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा शनिवारी (दि.१७) उत्साहात झाला. २२ वर्षांनी एकत्रित येत या विद्यार्थ्यांनी आठवणींना उजाळा देत मौजमजा केली.

काहींनी सध्याच्या नवीन आठवणी या निमित्ताने सांगितल्या. काहींनी शाळेच्या गमती जमती, रुसवे, फुगवे, एकमेकांना केलेली मदत, खेळ आशा अनेक गोष्टींची आठवण करून देत प्रत्येकाच्या चेहऱ्यावर अतिशय गोड हास्य फुलले होते. या मेळाव्यात मयूर उभारे, रोहित जगताप, विजेंद्र मानकर, रोशना वडेकर, प्राप्ती साळी, प्रदीप उभारे, माधुरी उभारे, निखिल जागुष्टे, अतुल लोखंडे, रुपाली देवधर, नितीन केकाणे, नितीन आंब्रे, शांती गायकवाड, चिन्मय मोने, रुपेश मुंढे, रुपाली म्हात्रे, तृप्ती गुजर, राहुल बोंबले, शुभांगी पवार आदी सहभागी झाले होते.




### ग्रामपंचायत माडप
ता. खालापुर, जि. रायगड

दिनांक :- २१/०८/२०२४

### जाहिर निविदा

सर्व बांधकाम ठेकेदार व पुरवठादार यांस जाहिर निविदाद्वारे कळविण्यात येते की, ग्रामपंचायत माडप ता. खालापुर, जि. रायगड यांजकडून ग्रामपंचायत १५ वा वित्त आयोग व ग्रामनिधी कामाच्या अनुभविक इच्छुक जी.एस.टी. धारक ठेकेदारांकडून व पुरवठा धारकांकडून लिफाफा पद्धतीने मोहरवंद निविदा मागविण्यात येत आहेत. तरी ज्या ठेकेदारांना सदरची कामे करावयाची आहेत व पुरवठाधारकांनी ज्या वस्तु पुरवायचे आहेत त्यांनी आपली निविदा दि.२१/०८/२०२४ पासुन दि.२७/०८/२०२४ पर्यंत सकाळी ठिक १०.०० वाजेपर्यंत समक्ष ग्रामपंचायत कार्यालयात सादर करावीत व सदर निविदा दि.२८/०८/२०२४ रोजी सकाळी ठिक ११.०० वा. मा. सरपंच व सदस्य व ठेकेदार पुरवठादार यांच्या उर्पास्यतीत समक्ष उघडण्यात येतील, कोणतीही एक अगर सर्व निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा आधिकार मा. सरपंच यांनी राखून ठेवलेला आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | योजनेचे नाव | इसारा रक्कम | काम पुर्ण करण्याची कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १. | ड्रेनेज बांधकाम माडप | १,२०,०००/- | १५ वा वित्त आयोग बंधित २४-२५ | १२००/- | ६ महिने |
| २. | वैयक्तिक परांसाठी कंपोस्ट खड्डे तयार करणे. | ३०,०००/- | १५ वा वित्त आयोग बंधित २४-२५ | ३००/- | ६ महिने |
| ३. | सांडपाणी व्यवस्थापन यंत्रणेची देखभाल व दुरुस्ती | ५७,४५०/- | १५ वा वित्त आयोग बंधित २४-२५ | ५७४/- | ६ महिने |
| ४. | कुटुंबाच्या गटासाठी सामुदायिक कंपोस्ट खड्डे तयार करणे. | ३०,०००/- | १५ वा वित्त आयोग बंधित २४-२५ | ३००/- | ६ महिने |
| ५. | नवीन पाईप पाणी पुरवठा यंत्रणेचे बांधकाम | १,००,०००/- | १५ वा वित्त आयोग बंधित २४-२५ | १०००/- | ६ महिने |
| ६. | विद्यमान पाईप लाईन चा विस्तार करणे, | १.१४,४५०/- | १५ वा वित्त आयोग बंधित २४-२५ | ११४४/- | ६ महिने |
| ७. | रस्त्याचे बांधकाम करणे. | १,००,०००/- | १५ वा वित्त आयोग अबंधित २४-२५ | १०००/- | ६ महिने |
| ८. | सौर दिवे बसविणे, (खरेदी करणे.) | २०,०००/- | १५ वा वित्त आयोग अबंधित २४-२५ | - | ६ महिने |
| ९. | विशेष गरज असलेल्या मुलांसाठी AWC मध्ये रॅम्प बांधणे, | ५,०००/- | १५ वा वित्त आयोग अबंधित २४-२५ | - | ६ महिने |
| १०. | पौष्टिक पदार्थाचे वितरण | १६,०००/- | १५ वा वित्त आयोग अबधित २४-२५ | - | ६ महिने |
| ११. | AWC मध्ये पिण्याच्या पाण्याचे आर. ओ. युनिट बसविणे, खैरे कातकरीवाडी, | १२,०००/- | १५ वा वित्त आयोग अबंधित २४-२५ | - | ६ महिने |
| १२. | पोषणवर IEC साहित्य | १०,०००/- | १५ वा वित्त आयोग अबंधित २४-२५ | - | ६ महिने |
| १३. | शाळांमध्ये मुली आणि मुलांसाठी स्वतंत्र स्वच्छता गृह बांधणे. | ८०,०००/- | १५ वा वित्त आयोग अबंधित २४-२५ | ८००/- | ६ महिने |
| १४. | ग्रा.पं. हद्दीतील सर्व गाव वाड्या वस्तीतील रस्त्यावरील चिकटपणा/शेवाळ घालविणेकामी व रस्ता स्वच्छताकामी शेवाळी पावडर खरेदी करणे. | ९९,८००/- | ग्रामनिधी २४-२५ | - | १ महिने |
| १५. | ग्रा.पं. सर्व गाव वाड्या वस्तीमधील रस्ते, पाणवठे रस्ते गणपती घाट, शाळा अंगणवाड्या कडे जाणारे रस्ते व इतर सार्वजनिक परिसर गवत काढून साफसफाई करणे. | ७५,५००/- | ग्रामनिधी २४-२५ | ५००/- | ६ महिने |
| १६. | माडप ठाकूरवाडी कडे जाणाऱ्या रस्त्याचे खड्डे भरणे. | १,००,०००/- | ग्रामनिधी २४-२५ | १०००/- | ६ महिने |
| १७. | माडप ठाकुर वाडी स्टेज बांधकाम करणे, | २,००,००० | ग्रामनिधी १५ टक्के मागासवर्गीय २४-२५ | २०००/- | ६ महिने |

**अटी शर्ती :-**

१. सदर कामाची कोरी निविदा दि. २१/०८/२०२४ पासुन दि.२७/०८/२०२४ पर्यंत सुट्टीचे दिवस वगळून उपलब्ध होतील.
२. निविदे सोबत एक टक्का इसारा रक्कम ग्रामपंचायत माडप या नावाने डिमांड ड्राफ्ट स्वरुपात भरल्याची पावती जोडणे आवश्यक आहे किंवा रोखीने ग्रामंपचायत मध्ये सामान्य पावतीने भरणा करावी.
३. निविदा मंजुर झालेल्या ठेकेदाराला ५०० रु. च्या बाँड पेपरवर करारनामा करुन द्यावा लागेल.
४. सदरचे काम पंचायत समितीकडील संबधित तांत्रिक आधिकारी यांचे मार्गदर्शनाखाली व ग्रामपंचायतीच्या देखरेखेखाली पूर्ण करण्याचे आहे.
५. काम पूर्ण झाल्यावर कामाच्या बिलातुन ५ टक्के सुरक्षा अनामत, २ जी.एस.टी., २ टक्के आयकर, १ टक्का कामगार कल्याण, १ टक्का कामगार विमा इत्यादी रकमा कपात केल्या जातील.
६. ठेकेदार हा अनुभवी व GST धारक असावा.
७. सुरक्षा अनामत रक्कम कामाचा दर्जा पाहुन ६ महिन्याने परत केली जाईल.
८. कामाचे वेळी काही जीवीतहानी झाल्यास त्याची जबाबदारी ठेकेदाराची राहील.
९. काम सुरु करण्यापुर्वीचे फोटो, काम सुरु असतानाचे फोटो व काम पूर्ण झाल्यानंतरचे फोटो सादर केल्याशिवाय बिलाची रक्कम अदा केली जाणार नाही,
१०. पोस्टाने आलेल्या निविदा स्विकारल्या जाणार नाही.

**सही/-**
**ग्रामसेवक**
**ग्रामपंचायत माडप**
**ता. खालापूर, जि. रायगड**

**सही/-**
**सरपंच**
**ग्रामपंचायत माडप**
**ता. खालापूर, जि. रायगड**

### अलिबाग मांडवा येथे वाळूमध्ये कुस्ती स्पर्धा रंगली

# पुण्याच्या माऊलीने जिंकली आव्हानाची लढत

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग तालुक्यातील मांडवा येथील समुद्रकिनाऱ्यावर आयोजित करण्यात आलेलेल्या राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेत पुण्यातील हनुमान आखाड्याचा माऊली कोकाटे याने आव्हानाची लढत जिंकली. माऊलीने दिल्लीच्या दीपक हल्ला याला चीतपट केले. माऊलीने एक लाख ४१ हजार रुपयांची कमाई केली. त्याल मानाची गदा देऊन गौरविण्यात आले.



टाकावी स्पोर्ट क्लब मांडवा व ग्रामस्थ यांच्यातर्फे दरवर्षी नारळी पौर्णिमेच्या दिवशी मांडवा समुद्रकिनाऱ्यावर वाळूत राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धा आयोजित केली जाते. या स्पर्धेला १५० वर्षांची परंपरा आहे असे येथील ग्रामस्थ सांगतात. यंदा सोमवारी (दि. १९) झालेल्या या सपर्धेत रायगडसह पुणे, कोल्हापूर, सातारा, सोलापूर, नाशिक, जळगाव, अहमदनगर जिल्ह्यांसह देशभरातील मल्ल सहभागी झाले होते. आमदार महेंद्र दळवी, भाजप दक्षिण रायगड जिल्हा उपाध्यक्ष दिलीप भोईर आदींनी या स्पर्धेला भेट देऊन कौतुक केले.

#### कोन आखाड्याला सर्वसाधारण विजेतेपद

या स्पर्धेत विविध वयोगटातील सुमारे २५० कुस्त्या खेळवण्यात आल्या. कलानिकेतन कोन गाव कल्याण आखाड्याने सर्वाधिक कुस्त्या जिंकून सर्वसाधारण विजेतेपद मिळवले. अलिबाग तालुक्यातील जय हनुमान वाडगाव आखाडा उपविजेता ठरला. तृतीय क्रमांक ठाणे जिल्ह्यातील गोवे आखाड्याने मिळवला.

# उरणमधील गोशीन रियूच्या खेळाडूंची राज्य स्तरावर निवड

### अलिबाग येथील स्पर्धेत जिंकली पदके



**उरण : बातमीदार, प्रतिनिधी**

अलिबाग येथे २१वी ट्रेडिशनल बेल्टरेलिंग व मास रेसलिंग स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत विविध वजन गटात उरण तालुक्यातील पाणदिवे येथील स्पर्धक रेसलिंगपटूंनी पदके पटकविली. या सर्वांची जळगाव येथे होणाऱ्या राज्यस्तरीय ट्रेडिशनल स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

स्पर्धा संतोष कवळेसर यांच्या माध्यमातून झाली. यामध्ये दीप धनेश्वर म्हात्रे व रोहित घरत यांनी प्रत्येकी दोन सुवर्ण, श्लोक योगेश ठाकूर व गोपाळ दिनकर म्हात्रे प्रत्येकी एक सुवर्ण, आर्यन अमर पाटील रौप्य व कांस्य आणि वैदेही घरतने रौप्यपदक जिंकले.

या खेळाडूंना शिहान राजू कोळी, गोपाळ म्हात्रे, राकेश म्हात्रे यांनी मार्गदर्शन केले. सदर विजयी सर्व उमेदवारांचे सर्वच स्तरातून कौतुक होत आहे. यशस्वी खेळाडूंचे अभिनंदन होत आहे.

## सचिन-धोनी यांच्यानंतर आता युवराज सिंगवरही येतोय चित्रपट!

### चाहत्यांना उत्सुकता

**मुंबई : प्रतिनिधी**

भारताचा माजी क्रिकेटर युवराज सिंग हा प्रेरणादायी व्यक्तीमत्वांपैकी एक आहे. आता त्याच्या आयुष्याचा प्रवास चित्रपटाच्या माध्यमातून मांडण्यात येणार आहे. सिक्सर किंग युवीच्या आयुष्यावर आधारित चित्रपटाची नुकतीच घोषणा करण्यात आली आहे. चित्रपट समीक्षक तरण आदर्श यांनी आपल्या एक्स अकाउंटच्या माध्यमातून फोटो शेअर करत या संदर्भातील माहिती दिली.

तरण आदर्श यांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून शेअर केलेल्या फोटो पोस्टमध्ये युवराज सिंगची झलकही पहायला मिळते. भूषण कुमार-रवि भगचांदका युवीच्या बायोपिकचे निर्माते असतील, असा उल्लेखही या पोस्टमध्ये केल्याचे दिसून येते. आता युवीची भूमिका कोण साकारणार? असा प्रश्नही त्याच्या चाहत्यांना पडला आहे, पण यासाठी आणखी काही काळ प्रतीक्षा करावी लागेल, कारण अद्याप स्टार कास्टसंदर्भातील कोणतीही अधिकृत माहिती जाहीर करण्यात आलेली नाही.

## ‘बॉर्डर-गावसकर मालिकेत ग्रीन, मार्शने अधिक जबाबदारी घ्यावी’

**मेलबर्न : वृत्तसंस्था**

या वर्षाच्या अखेरीस होणाऱ्या बॉर्डर-गावसकर करंडक कसोटी मालिकेदरम्यान अष्टपैलू कॅमेरून ग्रीन व मिचेल मार्श यांनी गोलंदाजीत अधिक जबाबदारी घेणे अपेक्षित असल्याचे ऑस्ट्रेलियाचा कसोटी कर्णधार पॅट कमिन्स म्हणाला. नोव्हेंबरमध्ये भारत व ऑस्ट्रेलिया यांच्यातील पाच सामन्यांच्या कसोटी मालिकेला सुरुवात होणार आहे.

‘संघात अष्टपैलू खेळाडू असल्याचा नेहमीच फायदा मिळतो. गेल्या काही वर्षांपासून आम्ही त्यांचा पुरेसा वापर केलेला नाही, मात्र आगामी हंगामात काही वेगळे पाहायला मिळू शकते. आम्ही ग्रीन व मार्शला गोलंदाजीत अधिक जबाबदारी देऊ शकतो. ग्रीनने शील्ड क्रिकेटमध्ये गोलंदाज म्हणून सुरुवात केली होती, पण कसोटीत त्याला अधिक गोलंदाजी करावी लागली नाही. तो आता अधिक परिपक्व खेळाडू झाला आहे. त्यामुळे आम्ही त्याच्यावर थोडे अधिक निर्भर असू,’ असे कमिन्सने सांगितले.

## क्रीडा लवादाने स्पष्ट केले विनेशची याचिका फेटाळण्यामागील कारण

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

ऑलिम्पिकसारख्या मोठ्या स्पर्धेत खेळताना खेळाडूंनी त्यांच्या वजन मर्यादेपेक्षा कमी राहील याची काळजी घ्यायला हवी. कोणत्याही परिस्थितीत कुणी याला अपवाद ठरू शकत नाही, अशा शब्दात क्रीडा लवादाने भारताच्या विनेश फोगटची याचिका फेटाळण्यामागील कारण स्पष्ट केले.

दुसऱ्या दिवशी केलेल्या वजनात आलेले अपयश हे विनेशने केलेल्या एखाद्या बेकायदा किंवा चुकीच्या कृतीमुळे झालेले नसले, तरी त्या अपयशाचा परिणाम हा कठोरच मानला पाहिजे, असे क्रीडा लवादाचे डॉ. ॲनाबेल बेनेट यांनी म्हटले आहे.

ऑलिम्पिक स्पर्धेत ५० किलो वजन गटातून खेळताना विनेशने अंतिम फेरी गाठली होती, मात्र अंतिम फेरीपूर्वी घेण्यात आलेल्या वजनात शंभर ग्रॅम वजन अधिक भरल्याने विनेशला अंतिम फेरीसाठी अपात्र धरण्यात आले होते. या निर्णयाविरोधात विनेशने ऑलिम्पिकसाठी नियुक्त केलेल्या हंगामी क्रीडा लवाद समितीकडे याचिका दाखल केली होती. तीनवेळा निर्णय पुढे ढकलल्यानंतर क्रीडा लवादाने विनेशची याचिका फेटळाल्याचे जाहीर केले. यानंतर भारतीय ऑलिम्पिक संघटनेकडून तीव्र प्रतिक्रिया उमटली होती. क्रीडा लवादाने विनेशचे अपील



का फेटाळण्यात आले या संदर्भातील निर्णय प्रकाशित केला.

‘वजन गटांच्या स्पर्धेत वजन मर्यादेसंदर्भात तयार केलेले नियम सर्व खेळाडूंसाठी समान आहेत. यासाठी कोणताही अपवाद नाही. आपले वजन मर्यादेपेक्षा कमी राहील याची खात्री करणे ही केवळ खेळाडूची जबाबदारी आहे,’ असे क्रीडा लवादाने निर्णयात म्हटले आहे. या घटनेत विनेशचे वजन मर्यादेपेक्षा जास्त होते यात प्रश्नच नाही. याचे पुरावे विनेशला स्पष्टपणे आणि थेट सुनावणीच्या दरम्यान सादर केले. तिचे वजन १०० ग्रॅम अधिक भरले होते. हे प्रमाण खूप कमी असल्याने सहानुभूतीपूर्वक विचार करावा असे विनेशचे म्हणणे होते. विशेषत: मासिक पाळीपूर्वीच्या काळात पाणी प्यायल्याने किंवा पाणी शरीरात टिकवून ठेवल्यामुळे असे घडू शकते, असा युक्तिवाद करण्यात आला होता.

संयुक्त जागतिक कुस्ती महासंघाच्या (युडब्ल्यूडब्ल्यू) नियमानुसार जागतिक आणि ऑलिम्पिक स्पर्धेत दोन्ही दिवशी वजन अनिवार्य असते. दुसऱ्या दिवशी खेळाडू माघार घेणार असला, तरी त्याला वजन द्यावेच लागते. मानांकन स्पर्धा आणि अन्य आंतरराष्ट्रीय स्पर्धेत दोन किलो वजनाचा फरक मान्य केला जातो, पण जागतिक आणि ऑलिम्पिक स्पर्धेत असे करता येत नाही. ऑलिम्पिक स्पर्धेत अंतिम फेरीसाठी पात्र ठरणारी विनेश पहिली भारतीय महिला कुस्तीगीर ठरली होती, मात्र अंतिम फेरीपूर्वीच विनेश अपात्र ठरल्यामुळे कुस्ती जगतात हळहळ व्यक्त झाली.

## मोहम्मद शमी लवकरच करणार पुनरागमन

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारताचा दिग्गज वेगवान गोलंदाज मोहम्मद शमी सध्या दुखापतीमुळे क्रिकेटपासून दूर आहे, पण आता तो लवकरच स्पर्धात्मक क्रिकेटमध्ये पुनरागमन करण्याच्या उंबरठ्यावर आहे. यंदाच्या रणजी चषक स्पर्धेच्या सत्रात सुरुवातीच्या दोन सामन्यांमध्ये शमी बंगाल संघाकडून खेळणार असल्याची चर्चा आहे.



या दोन रणजी सामन्यांनंतर शमी मायदेशातील न्यूझीलंडविरूद्धच्या तीन कसोटी सामन्यांच्या मालिकेतील एका सामन्यात खेळू शकेल. मिळालेल्या माहितीनुसार शमी ११ ऑक्टोबरला यूपीविरुद्ध आणि १८ ऑक्टोबरला बिहारविरुद्धच्या सामन्यांपैकी एका सामन्यात खेळू शकतो. या दोन्ही सामन्यांमध्ये केवळ दोन दिवसांचे अंतर असल्याने शमी दोन्ही सामन्यांत खेळण्याची चिन्हे कमी आहेत.

न्यूझीलंडविरुद्धची तीन कसोटी सामन्यांची मालिका १९ ऑक्टोबरपासून बंगळुरू येथून सुरू होईल. यानंतर या मालिकेतील उर्वरित दोन सामने २४ ऑक्टोबरपासून पुण्यात, तर एक नोव्हेंबरपासून मुंबईत खेळविण्यात येतील. ऑस्ट्रेलियातील दौऱ्याआधी शमी या तीनपैकी एका सामन्यात खेळण्याची शक्यता आहे.

शमीने गेल्या वर्षी १९ नोव्हेंबरला अहमदाबाद येथे झालेल्या एकदिवसीय सामन्यांच्या विश्वचषक स्पर्धेचा अंतिम सामना खेळला होता. हा त्याचा आतापर्यंतचा अखेरचा अंतिम आंतरराष्ट्रीय सामना ठरला. या सामन्यापासून शमी स्पर्धात्मक क्रिकेटपासून दूर आहे. यंदा फेब्रुवारीमध्ये इंग्लंडमध्ये शमीच्या घोट्यावर शस्त्रक्रिया झाली होती.

मोहम्मद शमी पूर्णपणे तंदुरुस्त होण्यासाठी सध्या बंगळुरू येथील राष्ट्रीय क्रिकेट अकादमीमध्ये (एनसीए) घाम गाळत आहे. छोट्या रनअपसह कमी वेगाचा मारा करण्याचा सराव करतानाचा त्याचा व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर चर्चेत आला आहे. या वर्षाच्या अखेरीस होणाऱ्या ऑस्ट्रेलिया दौऱ्यासाठी शमी भारतासाठी महत्त्वाचा खेळाडू ठरणार आहे. त्यासाठी तो सज्ज होत आहे.

## ...तर आयपीएलमध्ये रिंकू सिंग ‘आरसीबी’कडून खेळण्यास उत्सुक

**मुंबई : प्रतिनिधी**

रिंकू सिंग आयपीएलमध्ये कोलकाता नाईट रायडर्स (केकेआर)कडून खेळतो. रिंकू केकेआरसाठी सर्वात महत्त्वाच्या खेळाडूं पैकी एक आहे. यंदा आयपीएलसाठी मेगा ऑक्शन होणार आहे. या मेगा ऑक्शनपूर्वी रिंकू सिंगच्या एका वक्तव्याने सर्वांना चकित केले आहे. वास्तविक, रिंकूने सांगितले की, केकेआरने त्याला मेगा ऑक्शनपूर्वी रिलीझ केले, तर त्याला कोणत्या संघात सहभागी व्हायला आवडेल?



रिंकू सिंगला या वर्षीच्या आयपीएल मेगा ऑक्शनपूर्वी कोलकाता नाइट रायडर्सने रिलीझ केल्यास रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूमध्ये सहभागी व्हायचे आहे. रिंकू सिंगने स्पोर्ट्स तकला दिलेल्या मुलाखतीत सांगितले की, केकेआरने त्याला रिलीझ केले, तर त्याला आरसीबी संघात जायला का आवडेल? रिंकू म्हणाला, जर केकेआर संघाने आयपीएल २०२५च्या मेगा ऑक्शनपूर्वी मला रिलीझ केले, तर मला आरसीबी संघात जायला आवडेल. याचे कारण म्हणजे त्या संघात विराट कोहली आहे.

## पॉवरलिफ्टिंग स्पर्धेसाठी महाराष्ट्राचे संघ रवाना

**पनवेल** : राष्ट्रीय वरिष्ठ गट पॉवरलिफ्टिंग अजिंक्यपद स्पर्धा पश्चिम बंगालमधील कोलकाता येथे २० ते २५ ऑगस्ट या कालावधीत होणार आहे. या स्पर्धेसाठी महाराष्ट्राचे महिला व पुरुष संघ रवाना झाले आहेत.

महिला गटात काजल भाकरे, प्रेरणा साळवी, आदिती सांगळे (ठाणे), हर्षदा घोले, सेजल मकवाना, आश्लेषा गुडेकर, अक्षया शेडगे (नवी मुंबई), मृणाली भोग (पुणे) यांचा समावेश आहे. पुरुष गटात धर्मेंद्र यादव, साहिल उतेकर, अश्विन सोळंकी, अजिंक्य पडवणकर (मुंबई), नीरजकुमार यादव, व्यंकटेश कोणार, जितेंद्र राणे (मुंबई उपनगर), ऋतुराज पाटील (कोल्हापूर) यांचा समावेश आहे. संघप्रमुख संजय सरदेसाई, संघ व्यवस्थापक विजय पाटील (पुणे) व प्रशिक्षक म्हणून सूर्यकांत गर्दे व अनंत चाळके (मुंबई) काम पाहणार आहेत.




## विराट-रोहितच्या दुलीप ट्रॉफी न खेळण्यावर सुनील गावसकर नाराज



**मुंबई : प्रतिनिधी**

दुलीप ट्रॉफीसाठी संघांची घोषणा करण्यात आली आहे. दुलीप ट्रॉफीमध्ये भारताचे जसप्रीत बुमराह, रोहित शर्मा आणि विराट कोहली वगळता जवळपास सर्वच खेळाडू खेळताना दिसतील. बुमराहला विश्रांती देण्यात आली आहे, मात्र वरिष्ठ खेळाडूंबाबत सुनील गावस्कर यांनी वेगळीच प्रतिक्रिया दिली आहे.

कोहली-रोहितशिवाय जसप्रीत बुमराह, मोहम्मद शमी, हार्दिक पांड्या यांची नावे संघात नव्हती. यानंतर बीसीसीआयचे अध्यक्ष जय शाह यांनी याबाबत बोलताना सांगितले की, आगामी मोठ्या स्पर्धा पाहता देशांतर्गत क्रिकेटमध्ये सहभागी होण्यासाठी त्यांच्यावर कोणतेही दडपण नाही. जय शाह म्हणाले, त्यांना कोणतीही दुखापत होऊ नये यासाठी त्यांच्यावर देशांतर्गत क्रिकेटमध्ये सहभागी होण्यासाठी दबाव टाकला जात नाही.

माजी भारतीय कर्णधार गावसकर यांनी मिड डेमध्ये लिहिलेल्या स्तंभात विराट आणि रोहित दुलीप ट्रॉफीमध्ये खेळणार नाहीत याबद्दल नाराजी व्यक्त केली आहे. त्याचबरोबर या दोन्ही दिग्गज खेळाडूंनी दुलीप ट्रॉफी का खेळली पाहिजे होती याबद्दलही सांगितले आहे.

गावस्कर यांनी आपल्या स्तंभलेखात लिहिले आहे की, निवडकर्त्यांनी कर्णधार रोहित शर्मा आणि विराट कोहलीला दुलीप ट्रॉफी स्पर्धेसाठी संघात निवडले नाही. त्यामुळे ते जेव्हा बांगलादेश कसोटी मालिकेत खेळतील तेव्हा त्यांनी जास्त सामन्यांचा सराव केलेला नसणार. खेळाडूंना अतिरिक्त सराव आवश्यक होता.

## गोलंदाज फलंदाजांपेक्षा स्मार्ट -बुमराह

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

एका वृत्तसमुहाशी बोलताना भारताचा स्टार गोलंदाज जसप्रीत बुमराह याने, माझा विश्वास आहे की, गोलंदाज ‘स्मार्ट’ असतात, कारण त्यांना फलंदाजांना बाद करावे लागते. फलंदाजांना बाद करण्यासाठी गोलंदाजांना कठोर परिश्रम घ्यावे लागतात तसेच त्यांना फलंदाजांसारखे बॅटच्या मागे लपण्याची गरज नसते, त्यांना सपाट विकेट्सच्या मागे लपण्याची गरज नसते. आम्ही नेहमीच टार्गेटवर असतो. जेव्हा आम्ही एखादा सामना हारतो, तेव्हा त्याचे खापर सहसा गोलंदाजांवरच फोडले जाते, असे म्हटलेय.



जसप्रीत बुमराह उदाहरण देताना म्हणाला, आपण पॅट कमिन्सला कर्णधार म्हणून दमदार कामगिरी करताना पाहिले आहे तसेच मी लहान असताना वसीम अक्रम आणि वकार युनूस यांना कर्णधार म्हणून पाहिले. विशेष म्हणजे कपिल देव यांनी आपल्याला पहिला विश्वचषक जिंकून दिला आहे. इम्रान खान यांनीदेखील पाकिस्तानला विश्वचषक जिंकून दिला आहे. त्यामुळे मला वाटते गोलंदाज हुशार (स्मार्ट) असतात.

जसप्रीत बुमराह पुढे म्हणाला की, लोक फलंदाजांशी अधिक जोडले जातात, परंतु भारतीय संघात फलंदाज आणि गोलंदाज यांच्यात कोणताही फरक नाही. मला माहीत आहे की आपल्या देशाला मोठ्या प्रमाणात फलंदाज आवडतात आणि ते योग्यच आहे, पण माझ्या मते गोलंदाज खेळाला पुढे घेऊन जातात, कारण मी अशा पिढीतून आलो आहे, जिथे कसोटी क्रिकेट टेलिव्हिजनवर अधिक दाखवले जायचे. त्यामुळे माझ्यासाठी आजपर्यंत हा फॉरमॅट सर्वात महत्त्वाचा राहिला आहे. मला वाटते की, जर मी यामध्ये चांगली कामगिरी केली. तर इतर सर्व फॉरमॅटमध्ये आपसूकच चांगली कामगिरी होईल.




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com